RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.१९ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जम्मू-काश्मीरच्या विनाशाला तीन कुटुंबे जबाबदार श्रीनगरमधून पीएम मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ श्रीनगर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी(दि.१९) श्रीनगरमध्ये आपल्या पहिल्या निवडणूक रॅलीला संबोधित केले. यावेळी त्यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. 'काल येथे पहिल्या टप्प्यातील मतदान झाले, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. पहिल्यांदाच राज्यात दहशतीच्या सावलीशिवाय मतदान झाले. काश्मीरच्या विध्वंसाला तीन घराणे जबाबदार आहेत, मात्र आता राज्य या घराणेशाहीच्या तावडीत राहणार नाही,' असं पीएम मोदी म्हणाले.

'कालच ७ जिल्ह्यांमध्ये पहिल्या फेरीचे मतदान झाले. पहिल्यांदाच दहशतीच्या सावलीशिवाय हे मतदान झाले. एवढ्या मोठ्या संख्येने लोक मतदानासाठी घराबाहेर पडले ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. मतदानासाठी लोक मोठ्या संख्येने बाहेर पडले. सर्वांनीही मोकळ्या मनाने मतदान केले. अनेक जागांवर मतदानाचे विक्रम मोडले. किश्तवाडमध्ये ८०% पेक्षा जास्त, डोडा जिल्ह्यात ७१% पेक्षा जास्त



मतदान, रामबनमध्ये ७०% पेक्षा जास्त आणि कुलगाममध्ये ६२% पेक्षा जास्त मतदान झाले. अनेक जागांवर गतवेळचे मतदानाचे विक्रम मोडले.'

मोदी पुढे म्हणतात, 'काँग्रेस-एनसी-पीडीपीने राज्यात फूटीचे राजकारण केले होते. पण भाजप सर्वांना जोडत आहे. काश्मीरच्या विनाशाला तीन कुटुंबे जबाबदार आहेत. या तिन्ही कुटुंबांना वाटते की, त्यांच्यावर कुणी प्रश्न उपस्थित करू शकतत नाही. खुर्चीवर बसून तुम्हाला जनतेला लुटायचे आहे. तुमचा न्याय्य हक्क हिरावून घेणे हे या लोकांचे काम आहे. त्यांनी जम्मू आणि काश्मीरला फक्त अराजकता दिली. पण आता जम्मू-काश्मीर या तीन राजघराण्यांच्या ताब्यात राहणार नाही.'

**दुसरी पिढी वाया जाऊ देणार नाही: पंतप्रधान मोदी**

'जम्मू-काश्मीरला दहशतवादापासून मुक्त करणे, जम्मू-काश्मीरविरुद्ध कट करणाऱ्या प्रत्येक शक्तीला पराभूत करणे आणि येथील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. या तीन कुटुंबांकडून दुसरी पिढी नष्ट करू देणार नाही. येथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी मी पूर्ण प्रामाणिकपणे काम करत आहे. आज जम्मू-काश्मीरमध्ये शाळा आणि महाविद्यालये सुरळीत सुरू आहेत. मुलांच्या हातात पेन, वह्या, लॅपटॉप असतात. आज राज्यात नवीन शाळा, नवीन महाविद्यालये, एम्स, वैद्यकीय महाविद्यालये, आयआयटी बांधल्याच्या बातम्या येतात,' असेही मोदी यावेळी म्हणाले.

## बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीपेक्षा महाविकास आघाडीत यावे; जयंत पाटील यांची खुली ऑफर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ मुंबई**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात जागावाटपाच्या चर्चा पुढे सरकताना पाहायला मिळत आहेत. राजकीय वर्तुळात दावे-प्रतिदावे केले जात आहेत. यातच महायुती आणि महाविकास आघाडीला एक पर्याय म्हणून आता तिसरी आघाडी केली जात आहे. छत्रपती



संभाजीराजे, राजू शेट्टी आणि बच्चू कडू यांनी पुढाकार घेऊन तिसऱ्या आघाडीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यासंदर्भातील एक बैठकही घेण्यात आली. याबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.

बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीपेक्षा महाविकास आघाडीत यावे, अशी आमची इच्छा आहे. बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी आमच्याबरोबर येत असतील तर आम्ही स्वागतच करू. आम्ही भाजपा, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्याविरोधात महाराष्ट्रात एका आघाडी तयार केली आहे. पण आमच्या मतांमध्ये विभागणी करण्यासाठी महाराष्ट्रात काही लोक उभे राहत आहेत, त्यांना भाजपाचा पाठिंबा आहे. अशा कोणत्याही प्रकाराला बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी बळी पडणार नाही, असा मला विश्वास आहे. महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाला अप्रत्यक्ष मदत होणार नाही, याची काळजी बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी घेतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे, असे जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

## माजी पोलीस आयुक्त संजय पांडे काँग्रेसमध्ये प्रवेश करणार; ठाकरेंची डोकेदुखी वाढणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ मुंबई**



येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे हे काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे. संध्याकाळी ४ च्या सुमारास मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडेल. संजय पांडे हे आगामी विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या माध्यमातून ते राजकीय मैदानात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संजय पांडे हे मुंबईतील वर्सोवा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. या जागेवर सध्या भाजपाच्या आमदार आहेत. लोकसभा निवडणुकीवेळीही संजय पांडे अपक्ष निवडणुकीला उभे राहतील अशी चर्चा होती. माजी आयपीएस अधिकारी असलेले संजय पांडे हे कायम चर्चेत राहिलेले आहेत. उत्तर भारतीय चेहरा म्हणून संजय पांडे काँग्रेसमध्ये सहभागी होतील. संजय पांडे यांचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशीही चांगले संबंध आहेत.

वर्सोवा मतदारसंघात ठाकरे गटाकडून राजूल पटेल यादेखील उत्सुक आहेत, मागील निवडणुकीत त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत बंडखोरी केली होती. पटेल यांना चांगली मतेही मिळाली होती. २००९ साली या मतदारसंघात काँग्रेस विजयी झाली होती. त्यानंतर २०१४ आणि २०१९ या काळात भाजपाच्या भारती लव्हेकर या मतदारसंघात निवडून आल्या. २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेच्या राजुल पटेल यांनी या मतदारसंघात अपक्ष निवडणूक लढवत ३२ हजार मते घेतली होती.

## यशोमती ठाकूर यांना कसला अंहकार? खासदार बोंडेंवरून वहिनीसाहेबांनी नणंदबाईंना भरला दम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधींवर केलेल्या वादग्रस्त विधानावरून काँग्रेस आक्रमक झालीय. राज्यातील अेक ठिकाणी काँग्रेसकडून आंदोलन केलं जात आहे. तर अमरावतीत वहिनीसाहेब आणि नणंदबाई आमनेसामने आले आहेत. आमदार यशोमती ठाकूर यांनी खासदार बोंडे यांना खडेबोल सुनवाल्यानंतर भाजप



नेत्या नवनीत राणा यांनी त्यांना प्रतित्तुर दिलंय.

विजय हा पचवता आला पाहिजे. विजय हा उतू जात आहे. अमरावतीची जनता येत्या काळात तुम्हाला नक्की धडा शिकवेल, अशा शब्दात अमरावतीच्या भाजप नेत्या नवनीत राणा यांनी यशोमती ठाकूर यांना सुनावले आहे. यामुळे अमरावतीत बोंडे यांच्या विधानावरून वहिनीसाहेब आणि नणंदबाई यांच्या वाद पेटलाय.काल पोलीस आयुक्त यांच्या दालनात तमाशा झाला. यशोमती ठाकुर माझी नणंद बाई यांनी त्या ठिकाणी अनिल बोंडे यांना शिवीगाळ केली. कधी खासदाराला धक्के मारणे खासदारांला हरामखोर म्हणणे. ही पद्धत एका राजकीय नेत्याला शोभण्यासारखी नाही. लोकशाहीत आपले मत मांडण्याचा सगळ्याना अधिकार आहे.महिला नेत्यांच्या तोंडी, अशी भाषा शोभत नाही ही अमरावतीची संस्कृती नाही, अशी टीका करतांना राणा यांनी लोकसभा निवडणुकीच्या विजयावरूनही ठाकूर यांचा वचपा काढलाय. यशोमती ठाकूर यांना नेमका अहंकार कशाचा आहे.कुणी पराभूत होते कोणी निवडून येते. विजय हा पचवता आला पाहिजे. विजय उतू येत आहे. अमरावतीची जनता येत्या काळात तुम्हाला नक्की धडा शिकवेल, असा सणसणीत टोला त्यांनी यशोमती ठाकूर यांना लगावलाय.

## आरक्षणाचा वाद: मनोज जरांगे पाटील यांना 'बिग बॉस'मध्ये घ्या; लक्ष्मण हाकेंचा खोचक टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९वडीगोद्री**

आगामी विधानसभा निवडणूक जशी जवळ येत आहे, तसा राज्यात आरक्षणाचा वाद वाढताना पाहायला मिळत आहे. सगेसोयरे विषय तसेच मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. तर ओबीसी आरक्षण वाचावे, यासाठी आंदोलन करत असलेले लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांना जशास तसे प्रत्युत्तर देण्याची तयारी सुरू केल्याचे सांगितले जात आहे. काही ओबीसी आंदोलकांनी वडीगोद्री येथे उपोषणास सुरुवात केली आहे.

एकीकडे मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यावे सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी, यासाठी मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू असून, दुसरीकडे मंगेश ससाणे आणि आंदोलकांचे सगेसोयरे अधिसूचना रद्द करावी, कुणबी



दाखल्याद्वारे होत असलेली घुसखोरी थांबवावी या मागणीसाठी उपोषण सुरू आहे. यातच आता लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांना खोचक टोला लगावला आहे.

मनोज जरांगे प्रत्येक आंदोलनाला वेगळी मागणी करत आहेत. जरांगेंना तुमच्या बिगबॉस मध्ये घ्या अशी माझी बिग बॉसच्या लोकांना मागणी आहे. यापेक्षा जरांगेंची कुठेही लायकी नाही, अशी बोचरी टीका लक्ष्मण हाके यांनी केली. जरांगेच्या बॅनरवर फुले शाहू आंबेडकरांचा फोटो लागलेला दिसतो का? असा सवालही त्यांनी केला. जरांगे नावाच्या माणसाच्या सांगण्यावरून मुख्यमंत्री जीआर काढतात याची लाज वाटते. हैदराबाद गॅझेट ,सातारा गॅझेट आणि बॉम्बे गॅजेट लागू करण्याची शासनाची हालचाल सुरू आहे हा अधिकार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना कोणी दिला मुख्यमंत्र्याला कायदा कळतो का? असा प्रश्न लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला.दरम्यान, जरांगे नावाच्या माणसाच्या सांगण्यावरून जीआर काढणार असाल तर ओबीसींचे जशास तसे उत्तर देणार असल्याचा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला. राहुल गांधी तुम्ही ओबीसीची भाषा बोलतात. पृथ्वीराज चव्हाण नावाचा जातीवादी माणूस अंतरवाली सराटीला जाऊन आला, त्यांनी ओबीसींच्या भावना ऐकून घ्याव्यात, अशी टीका हाके यांनी केली.

## २१ सप्टेंबरला संपूर्ण विदर्भ, मराठवाड्याला यलो अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ नागपूर**

पावसाने गणरायाच्या विसर्जनात कोणताही अडथळा आणला नाही. त्यामुळे भाविकांनी गणरायाला उत्साहात, वाजतगाजत निरोप दिला. मात्र, आता पाऊस पुन्हा परतला आहे. भारतीय हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट दिला आहे.

राज्यात संपूर्ण गणेशोत्सवात पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या, पण कुठेही मुसळधार पाऊस झाला नाही. दरम्यान, आता झारखंड आणि छत्तीसगड परिसरात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे येत्या दोन दिवसात राज्यातील विविध भागात मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात आणि विशेषकरून विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात येत्या ४८ तासात पावसाचा जोर वाढणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे अलर्ट देण्यात आले आहे.

## काँग्रेस आणि भाजपाला उखडून फेकण्याचे दिवस, बच्चू कडू यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे राज्यातील सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. सर्वच नेत्यांच्या सध्या राज्यभरात ठिकठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत होण्याची शक्यता आहे. त्यातच राज्यात तिसऱ्या आघाडीचीही चर्चा राजकीय वर्तुळात आहे. तिसऱ्या आघाडीमध्ये संभाजीराजे छत्रपती, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू यांच्यासह आदी काही नेत्यांचा सहभाग असल्याची शक्यता आहे.



तिसऱ्या आघाडीच्या संदर्भात बैठकांचा धडाकाही सुरु आहे. खरं तर राज्यातील महायुती सरकारला प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी पांठिबा दिलेला आहे. असे असतानाच आता बच्चू कडू यांनी काँग्रेस आणि राज्यातील भारतीय जनता पक्षाला इशारा दिला आहे. काँग्रेस आणि भाजपाने लुटणारी व्यवस्था निर्माण केली. त्या भाजपा आणि काँग्रेसला उखडून फेकण्याचे दिवस आले आहेत, असं विधान आमदार बच्चू कडू यांनी एका सभेत बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची लढाई गेल्या ७५ वर्षांपासून आपण लढतो आहोत. अजूनही शेतकऱ्यांना आणि शेतकऱ्यांच्या पोरांना मानसन्मान भेटत नाही. शेतकऱ्यांना अजून आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यामुळे आता ही बदल्याची भावना निर्माण होत आहे. आता येणारी ही निवडणूक बदला घेणारी असेल. ज्यांनी-ज्यांनी धर्म आणि जात सांगून आमचे मत घेतले त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहायचं नाही. कांद्यामुळे आम्हाला ज्यांनी ज्यांनी रडवलं मग काँग्रेस असूद्या अन्यथा भारतीय जनता पक्ष. गेल्या ७५ वर्षात भाजपा आणि काँग्रेसने दोन्ही पक्षांनी राज्य केलं.



### संपादकीय ......

# केजरीवाल यांची खेळी

*दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी गेल्या रविवारी आम आदमी पक्षाच्या (आप) कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये आपण मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत असल्याची घोषणा करून राजकीय वादळ निर्माण केले होते. मुख्यमंत्रिपद दोन दिवसांत सोडण्याचा निर्धारही व्यक्त करताना त्यानुसार ते पदावरून पायउतारही झाले. दिल्ली विधानसभेची मुदत फेब्रुवारी २०२५ मध्ये संपत असली, तरी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसोबत नोव्हेंबरमध्ये दिल्ली विधानसभेचीही निवडणूक घेण्याची मागणी त्यांनी केली; पण दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीसंदर्भातील निर्णय केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारच्या हाती असल्यामुळे त्यांच्या मागणीवरून मुदतपूर्व निवडणूक घेतली जाण्याची शक्यता नाही. राजीनाम्याची घोषणा करताना केजरीवाल यांनी नव्या मुख्यमंत्र्याच्या निवडीचा निर्णय घेतला होता आणि विधानसभा भंग करण्याची शिफारसही केली नव्हती.*

*मद्य विक्री घोटाळ्याप्रकरणी तुरुंगात असलेल्या केजरीवाल यांना गेल्या शुक्रवारी सुप्रीम कोर्टाने जामीन मंजूर केला; पण त्याचवेळी सुप्रीम कोर्टाने त्यांना दिल्लीच्या सचिवालयात जाण्यास मज्जाव केला होता. नायब राज्यपालांच्या परवानगीविना कोणत्याही फायलीवर स्वाक्षरी करण्यास मनाई केली. मद्य विक्री घोटाळा प्रकरणात दिल्लीचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, आपचे खासदार संजय सिंह तसेच भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांची यापूर्वीच जामिनावर सुटका झाली आहे. त्यामुळे केजरीवाल यांना जामीन मिळणे निश्चितच समजले जात होते. जामीन मिळाल्याने जम्मू-काश्मीर तसेच हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात केजरीवाल यांना सहभागी होता येईल; पण त्याचवेळी त्यांना निर्णयाचे कोणतेही अधिकार ठेवण्यात आलेले नव्हते. तसेच प्रत्येक गोष्टीत नायब राज्यपालांची मान्यता घेणे आवश्यक आहे, अशी अट न्यायालयाने घातली. त्यामुळे मुख्यमंत्रिपदी असून उपयोग तो काय, असा प्रश्न केजरीवाल यांच्या मनात निर्माण झाला असणार. माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया त्यांचे वारस असतील, अशा बातम्या होत्या; पण सिसोदिया यांचे नाव केजरीवाल यांनीच फेटाळून लावले. त्यामुळे सौरभ भारद्वाज, कैलाश गहलोत, राघव चड्डा, गोपाल राय यांच्या नावांची मुख्यमंत्रिपदासाठी चर्चा सुरू झाली. केजरीवाल यांची पत्नी सुनीता यांच्याकडेही मुख्यमंत्रिपद सोपवले जाऊ शकते, असेही बोलले जात होते; पण त्यामुळे घराणेशाही हा मुद्दा घेऊन विरोधक टीका करतील, अशी शक्यता होती, याचा नीट विचार करून आता दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून आतिशी मारलेना-सिंग यांची 'एकमता'ने निवड केली गेली. आतिशी या २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी प्रथमच निवडून आलेल्या आमदार आहेत. त्या अगोदर सिसोदिया उपमुख्यमंत्रिपदी असताना त्यांच्या सल्लागार होत्या. शिक्षण क्षेत्रात दिल्ली सरकारने जे अनेक चांगले उपक्रम राबवले, त्यात आतिशी यांचा मोठा वाटा आहे. त्या मंत्री झाल्या, तेव्हा त्यांच्याकडे शिक्षण, भाजपच्या सुषमा स्वराज व काँग्रेसच्या शीला दीक्षित यांच्यानंतर दिल्लीच्या त्या तिसर्‍या महिला मुख्यमंत्री आहेत. केजरीवाल यांना त्या गुरू मानतात. केजरीवाल, सिसोदिया प्रभृती तुरुंगात असताना, जलसंपदा, महसूल, नियोजन आणि वित्त आदी महत्त्वाच्या खात्यांचे काम त्या पाहतच होत्या.*

*दिल्लीच्या राजकारणात 'आप'मध्ये स्थित्यंतर होत असताना यामागचे राजकारणही समजून घेतले पाहिजे. 'आप'च्या काही नेत्यांवर भ-ष्टाचार, गैरव्यवहाराचे आरोप झाले आहेत. मद्य गैरव्यवहार प्रकरणात अनेकांची नावे गुंतलेली आहेत. अशावेळी स्वच्छ प्रतिमेच्या आतिशी या पक्षाला मते मिळवून देऊ शकतात, असा विचार केजरीवाल यांनी केलेला दिसतो. सिसोदिया हे जामिनावर बाहेर आहेत. संजय सिंग संसदेत असून, त्यांना मुख्यमंत्री केल्यास पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागून, त्यात विजय मिळण्याची खात्री नव्हती. तसेच संजय सिंग हे प्रभावी वक्ते असून, ते मुख्यमंत्री बनल्यास अधिक लोकप्रिय होण्याचा संभव आहे. त्यामुळे केजरीवाल यांनी त्यांचा विचार केला नसावा. उलट अन्य अनेक नेत्यांपेक्षा केजरीवाल यांनीच आतिशी यांना प्रथमपासून नेतृत्वाच्या फळीत पुढे आणल्यामुळे त्या त्यांच्याशी अधिक एकनिष्ठ आहेत. दिल्लीच्या जनतेच्या मनातील मुख्यमंत्री केजरीवाल हेच आहेत, हे आतिशी यांनी पत्रकार परिषदेत सांगून केजरीवालनिष्ठेचे प्रदर्शनही केले आहे. केजरीवाल यांच्याखेरीज अन्य कोणत्याही नेत्याबाबत पक्षात सहमती होणार नाही, हेसुद्धा त्यांनी एकप्रकारे सूचित केले.वास्तविक लोकांचे प्रश्न सोडवणे, विकासासाठी काही प्रमुख कामे करणार, हे नव्या मुख्यमंत्र्यांनी सांगणे अपेक्षित होते; पण आमचा पक्ष इतर राजकीय पक्षांसारखा सत्तावादी नाही, असा दावा करणारा आप हा प्रत्यक्षात इतरांप्रमाणेच केवळ सत्तेसाठी धडपडत आहे. तोही व्यक्तिस्तोम माजवणारा आहेच. राजकीय आणि व्यवस्थात्मक परिवर्तनाच्या बाता करणारा हा पक्ष केवळ सवंग राजकारणच करत आहे. या परिस्थितीत केजरीवाल यांनी ही नवी खेळी केली. त्यामुळे आतिशी केवळ केजरीवाल यांचे प्यादे म्हणून वावरतील. सामान्यांच्या नावाने गळा काढणार्‍या 'आप'ची ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.*

# पितृपक्षात कोणत्या गोष्टी केल्यास तुमचे पूर्वज नाराज होतील, कोणत्या कृतीने पूर्वज खुश होतील?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** – अनंत चतुदर्शीच्या दुसर्‍या दिवसापासून पितृपक्षाला सुरुवात झाली आहे. पितृ पक्षाच्या काळात पितरं पृथ्वीवर वास करतात. यावेळी तृप्त किंवा अतृप्त अशा सर्व पितरांसाठी तर्पण, श्राद्ध, पिंडदान वगैरे केली जातात, यामुळे पितरांचा आत्मा तृप्त होतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे हिंदू धर्मात पितृ पंधरवड्याला अतिशय महत्त्व आहे.



पितृ पंधरवड्याच्या काळात श्राद्ध घातल्याने पितरांना मोक्ष प्राप्त होतो, तसेच व्यक्ती पितृदोषापासून मुक्त होतो आणि त्याच्या घरात सुख-समृद्धी नांदते, अशी मान्यता आहे.

हिंदू धर्मात पितृपक्ष अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. धार्मिक मान्यतेनुसार कोणत्याही व्यक्तीच्या प्रगतीसाठी, यशासाठी आणि स्थैर्यासाठी देवांप्रमाणे त्याच्या पूर्वजांचे आशीर्वाद महत्त्वाचे असतात. पूर्वजांचे आशीर्वाद नसतील तर संबंधित व्यक्तीला आयुष्यात अडीअडचणींचा सामना करावा लागू शकतो.

पितृपक्षाच्या काळात कोणत्याही शुभ गोष्टींना प्रारंभ करु नये, असा संकेत आहे. त्यामुळे या काळात कोणतेही व्यवहार किंवा नव्या वस्तुंची खरेदी केली जात नाही.या काळात कोणतेही शुभकार्य उदाहरणार्थ लग्न, साखरपुडा किंवा गृहप्रवेश करु नये.

पितृपक्षाच्या काळात चुकूनही एखाद्या नव्या प्रकल्पाची किंवा मोहीमेची सुरुवात करु नये. गाडी किंवा घर खरेदीची बोलणी किंवा व्यवहारही पितृपक्षाच्या काळात टाळावा, असा संकेत आहे.

पितृपक्षाच्या काळात मांसाहार वर्ज्य आहे. याशिवाय पितृपक्षाच्या काळात केस, दाढी आणि नखं कापू नयेत, असा संकेत आहे.या काळात कोणतेही शुभकार्य उदाहरणार्थ लग्न, साखरपुडा किंवा गृहप्रवेश करु नये.पितृपक्षाच्या काळात काय करावे अथवा काय करु नये, याबाबत काही संकेत आखून देण्यात आले आहे. त्यानुसार पितृपक्षात नव्या कपड्यालत्याची खरेदी करु नये. अगदी ऑनलाईन साईटवरुनही कपडे खरेदी करु नयेत.पूर्वजांना खुश करण्यासाठी तुम्ही कावळा, गाय आणि कुत्र्याला अन्न खायला घालावे.पितृपक्षाच्या काळात तुमच्या पूर्वजांचे आशीर्वाद मिळवण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करु शकता. तुम्ही दानधर्म किंवा गरजूंना मदत केल्यास पूर्वजांचे आशीर्वाद तुम्हाला मिळू शकतात. तुम्ही जितका दानधर्म आणि सत्कर्म कराल, तितक्या प्रमाणात तुम्हाला पितरांचे आशीर्वाद मिळतील, अशी मान्यता आहे.




# काय सांगता..! नाश्त्याला पोहे खाऊन ५ किलो वजन कमी होईल? आहारतज्ज्ञ काय सांगतात? जाणून घ्या

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक** : आजकालच्या धकाधकीच्या जीवनात अनेकांना स्वत:कडे लक्ष द्यायला वेळ नसतो. बदलती जीवनशैली, कामाचा ताण, जंकफूडचे सेवन यामुळे अनेकांना विविध आजारांनी ग्रासलंय. तर अनेकांचं वजन वाढत असल्याच्या समस्या उद्भवत आहेत. तुम्हाला माहित आहे का? वजन कमी करण्यासाठी न्याहारी म्हणजेच ब्रेकफास्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्ही योग्य न्याहारी खाल्ली, तर त्यामुळे शरीरात संपूर्ण दिवस ऊर्जा तर राहतेच पण वजन कमी होण्यासही मदत होते. काही लोक वजन कमी करण्यासाठी सकाळचा नाश्ता टाळतात, परंतु यामुळे वजन कमी होण्याऐवजी वाढू शकते. वजन कमी करण्यासाठी पोहे हा एक आरोग्यदायी पर्याय आहे.

**पोहे खाऊन वजन कसं कमी करायचं?**– पोहे हा पौष्टिकतेने परिपूर्ण नाश्ता आहे. यामुळे वजन कमी करण्यास देखील मदत होऊ शकते. एका वृत्तसंस्थेने घेतलेल्या मुलाखतीनुसार याबाबत माहिती देत आहेत आहारतज्ज्ञ राधिका गोयल. राधिका एक प्रमाणित आहारतज्ञ आणि पोषणतज्ञ आहे. त्यांच्या मते, नाश्ता खाल्ल्याने तुम्ही सुमारे ५ किलो वजन कमी करू शकता. तज्ज्ञांच्या मते, वजन कमी करण्यासाठी पोहे हा एक चांगला पर्याय आहे, परंतु तुम्ही वजन कमी करण्यासाठी घाई करू नका, तर केवळ आरोग्यदायी पर्यायांवर लक्ष केंद्रित करा. जर तुम्हाला वजन कमी करण्यात अडचण येत असेल, तर याचे सर्वात मोठे कारण म्हणजे खराब चयापचय, अशा परिस्थितीत तुम्ही चयापचय वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पोह्यांमध्ये लोह, फॉस्फरस, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि कार्ब्स मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यात खूप कमी कॅलरीज असतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे.




पोह्यात फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे बद्धकोष्ठता दूर होते.

हे खाल्ल्याने पोट बराच काळ भरलेले राहते आणि भूक लागत नाही.

पोहे पचायला खूप सोपे आहेत. ज्यांची पचनशक्ती कमकुवत आहे, त्यांनी त्यांच्या आहारात पोह्यांचा समावेश करावा.

हे आवश्यक नाही की तुम्ही पोहे फक्त नाश्त्यातच खाऊ शकता,

रात्रीच्या जेवणात किंवा संध्याकाळच्या नाश्त्यातही खाऊ शकता.

वजन कमी करण्यासाठी पोहे कसे बनवायचे?

वजन कमी करण्यासाठी अगदी कमी तेलात पोहे बनवा.

ऑलिव्ह ऑईल किंवा तूप कमी प्रमाणात घेण्याचा प्रयत्न करा.

त्यात भरपूर भाज्या घाला.

प्रोटीनसाठी तुम्ही त्यात चीजही घालू शकता.

निरोगी चरबीसाठी, आपण त्यात शेंगदाणे किंवा काजू देखील घालू शकता.

# कापूस पिकात बोंडअळी येऊ नये म्हणून कसा कराल करेक्ट कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

शेंदरी बोंडअळीचे शास्त्रीय नाव असून ही कपाशीवरील एक अतिशय हानीकारक कीड आहे. ही बोंडअळी बोंडाच्या आत राहून उपजिविका करते, बाहेरुन या किडीच्या प्रादुर्भावाची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. त्यासाठी वेळीच सावध होऊन शेंदरी बोंडअळीचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भावाची कारणे

– कपाशीच्या फरदडीखाली क्षेत्रात वाढ.

– जास्त कालावधीचे कपाशीचे संकरित वाण.

– विविध प्रकारच्या कपशीच्या संकरित वाणाची मोठी संख्या.

– कच्च्या कापसाची जास्त कालवधीपर्यत साठवणूक.

– पिकाच्या अवशेषाची शेतात साठवणूक.

– कपाशीची लवकर लागवड.

– बीटी जनुकास प्रतिकारशक्ती.

– आश्रय पिकाच्या ओळी न लावणे.

– योग्य वेळी शेंदरी बोंडअळीचे व्यवस्थापन न करणे.

– काही किटनाशके / किटकनाशकची मिश्रणे यांची फवारणी : कपाशीवर मोनोक्रोटोफॉस व ॲसिफेट ही किटकनाशके किंवा त्यांची मिश्रणे यांची फवारणी केल्यास कपाशीची कायिक वाढ होते. त्यामुळे फुले व बोंडे लागण्यामध्ये अनियमितता येते. त्यामुळे या किडीला सतत खाद्य उपलब्ध राहते.

एकात्मिक व्यवस्थापन




– कपाशीचे फरदड घेऊ नये.

– हंगाम संपल्यानंतर शेतामध्ये जनावरे किंवा शेळ्या, मेंढ्या चरण्यासाठी सोडाव्यात.

– शेतातील पिकांचे अवशेष वेचून जाळुन टाकावेत.

– हंगाम संपल्यावर ताबोडतोब पहाटीचा बंदोबस्त करावा. शेतात किंवा शेताजवळ पऱ्हाटी रचून ठेवू नये.

– पीक फेरपालट करावी. अंबाडी, भेंडी अशी पिके कपाशीपुर्वी किंवा नंतर घेऊ नयेत, त्यामुळे या बोंडअळीच्या जीवनक्रमात खंड पडेल.

– आश्रय (रेफुजी) ओळी लावाव्यात.

– कामगंध सापळे आणि प्रकाश सापळयांचा वापर करावा. हंगामामध्ये हे सापळे शेतामध्ये आणि हंगाम संपल्यावर जिनींग मिलजवळ, बाजारामध्ये लावावेत.

– प्रादुर्भावग्रस्त गळालेली पाते व बोंडे जमा करुन नष्ट करावेत.

– डोमकळ्या दिसून आल्यास त्या तोडून आतील अळ्यासह नष्ट करावे.

– कामगंध सापळयाचा वापर शेंदरी बोंडअळीचे पतंग मोठया प्रमाणात आकर्षित करणे आणि नर-मादी मिलनामध्ये अडथळा आणणे यासाठी करता येतो (१० सापळे/एकर).

– कमी कालावधीचे (१५० ते १६० दिवस) आणि एकाच वेळी जवळपास वेचणी करता येणाऱ्या संकरित वाणाची लागवड करावी.

– ट्रायकोग्रॅमाटॉयडीया बॅक्ट्री या परोपजीवी किटकांचे कार्ड (१.५ लाख अंडी/हे.) पिकावर लावावेत.

आर्थिक नुकसानीची पातळी

८-१० पतंग प्रति सापळा सलग ३ रात्री किंवा ५ ते १० टक्के प्रादुर्भावग्रस्त हिरवी बोंडे. (२० पैकी १ ते २ हिरवे बोंड प्रादुर्भावग्रस्त असल्यास) ही पातळी ओलांडल्यानंतर खालील रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.

# उद्याला विद्यापीठात 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' विषयावर कार्याशाळेचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती** – महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृह (ए.व्ही.थिएटर) येथे 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री सौरभ कटियार, पोलीस आयुक्त श्री नवीनचंद्र रेड्डी यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यशाळेला विद्यापीठाशी संलग्नित पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ. सुबोध भांडारकर, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांनी केले आहे.

# जुन्या सोयाबीनची आवक घटली, दरात समाधानकारक सुधारणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती** – गेल्या काही महिन्यांपासून ४२०० रुपयांपर्यंत खाली घसरलेल्या सोयाबीनच्या दरात अचानक आठवडाभरात सुधारणा झाली आहे. काही आठवडे ४२०० रुपयांचे दर आता ४५०० रुपयांपर्यंत पोहचले आहेत.

यंदाच्या हंगामातील सोयाबीन बाजारात दाखल होण्यास अद्याप १५ ते २० दिवसांचा आहे. अशात बाजार समित्यांत जुन्या सोयाबीनची आवक घटली आहे. बाजार समित्यांत सोयाबीनची आवक घटत असल्याने दरात वाढ होत असली तरी हमीभावापेक्षा कमीच दर मिळत असल्याने शेतकरी चिंतेत आहे. २०२३-२४ या वर्षासाठी ४६०० रुपयांचा हमीभाव निश्चित करण्यात आला होता. मात्र, सध्यस्थितीत शेतकऱ्यांना हमीभावदेखील मिळत नाही. केंद्र शासनाने २०२४-२५ या वर्षासाठी सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपयांपर्यंतचा हमीभाव निश्चित केला आहे.




**खाद्यतेलाच्या मागणीत वाढीचा परिणाम** – आंतरराष्ट्रीय स्तरावर खाद्य तेलाच्या मागणीत वाढ होत आहे. त्यामुळेच सोयाबीनच्या तेलाचे दरही मागील काही दिवसांपासून काहीसे वाढत आहेत. याचा परिणाम बाजारावर होत असून, मागणीच्या तुलनेत २ सोयाबीनचा पुरवठा कमी असल्याने सोयाबीनच्या दरात आता वाढ होत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. यापुढेही सोयाबीनच्या दरात सुधार होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे. बाजार समितीत सोयाबीनची आवक कमी आहे. जी आवक सुरु आहे, ती देखील गेल्या हंगामातील सोयाबीनची आहे. गेल्या आठवडाभरात सोयाबीनची मागणी वाढत जात आहे. त्यामुळे आठवडाभरातच सोयाबीनचे दर ३०० रुपयांनी वाढून ४५०० रुपयांपर्यंत पोहचले आहेत. दरम्यान, नवीन सोयाबीनची आवकला अजून १५ दिवसांचा वेळ लागेल.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १९ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# अखेर चांदूरबाजारला नियमीत तहसिलदार मिळाले

## तहसिलदारासह तीन ना.तहसिलदार रुजु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९चांदुर बाजार**

चांदूरबाजार तहसिल कार्यालय कालपर्यंत प्रभारीवरच सुरु होते.आगामी उत्सव व सण तसेच निवडणुकीदरम्यान कायदाव सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नियमीत तहसिलदार व नायब तहसिलदारांची पदे भरणे आवश्यक असल्याचा पाठपुरावा वृत्तपत्राच्या माध्यमातून सतत सुरु होता.याची दखल घेत शासनाने चांदूरबाजारला तहसिलदारासह तीन नायब तहसिलदारांची नियुक्ती करुन तालुक्याला दिलासा दिला. पालघर ठाणे येथुन प्रशिक्षण घेवून चांदूर बाजार तहसिल कार्यालयात तहसिलदार पदाचा कार्यभार सांभाळणारे रामदास शेळके हे तलाठी ते थेट तहसिलदारपदी नियुक्त झाले. रामदास शेळके यांचे शिक्षण बी.एस सी अँग्रो पुणे झाले. एक वर्ष त्यांनी तलाठी पदी कामकाज केले आहे.तर ९ वर्ष विक्रीकर निरीक्षक पद सांभाळले आहे.२०२२ मधे पालघर व वसई येथे अप्पर तहसिलदार म्हणून कामकाज केले.तेथुन थेट चांदूर बाजार तहसिलदार पदि त्यांची नियुक्ती झाली.तहसिलदार म्हणून शेळके यांचे चांदूरबाजार ही पहिलीच नियुक्ती आहे.चांदूर बाजार तहसिलदार रामदास शेळके यांना येथेअनेक आव्हानाना सामोरे जावे लागणार आहे. चांदूर बाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात विना रॉयटी व ओव्हरलोड मुरूम तस्करी, तसेच चांदूर बाजार तालुक्यातील नदीपात्रातील बेधडक पणे चालणारी रेती तस्करी, तहसिल कार्यालयातील प्रसाधन गृहात अस्वच्छता, नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था




नाही.तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील सर्व पदे रिक्त आहे.पुरवठा विभागाचा प्रभारी कारभार सुमेध सोनवणे कडे तर महसुल चे कनिष्ठ लिपिक इंगोले यांचे कडे गोडावून किपर चा कारभार आहे.तहसिल कार्यालयात कर्मचारी वेळेत येत नाही. त्यांना वेळेचे बंधन नाही, तहसिल कार्यालयाच्या आवारात अस्त, व्यस्त उभी राहणारी वाहनाने नागरीकांना तहसिल कार्यालयात जाताना होणारा त्रास,तहसिल कार्यालयात मोठ्या प्रमाणात दलालाचा वावर आहे.तहसिल कार्यालयात जाणार्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात सेतु केंद्र चालकांनी अतिक्रमण केले आहे. सेतु केंद्रात कामकाजासाठी येणार्या नागरीकांचे वाहने रस्त्याच्या मध्येच असतात. त्यामुळे तहसिल कार्यालयात येणार्या नागरीकांना अडचण निर्माण होते .चांदुर बाजार तहसिल कार्यालयात येणारे नागरिक व राजकीय पुढारी यांच्या समस्या नवनियुक्त तहसिलदार रामदास शेळके कोणत्या पध्दतीने हाताळतात हा येणारा काळच सांगेल.चांदूर बाजार तहसिल कार्यालयात तिन नायब तहसिलदाराची पदे रिक्त होती त्या तीन ठिकाणी पदे भरण्यात आली. यामध्ये चांदूर रेल्वे तहसिल कार्यालयातुन आलेले लक्ष्मीकांत तिवारी यांचे कडे निवासी नायब तहसिलदार पदाचा कारभार आहे.तर संजय गांधी विभागाचा पदभार अनिल चवरे यांचे कडे आहे.महसुल नायब तहसिलदार पदाचा कारभार मनोज सोनारकर यांचे कडे आहे.सर्वांनी आज आपल्या पदाचा पदभार सांभाळला आहे.

# यवतमाळ - चिखलदरा चालती बस पेटून जळून राख




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९चिखलदरा** मेळघाटच्या वळण रस्त्यावर दररोज अनेक अपघात होत आहेत. दरम्यान, बुधवारी रात्री आठ वाजता मोथा गावाजवळील राज्य परिवहन महामंडळाच्या यवतमाळ- चिखलदरा या 'लालपरी'ला अचानक आग लागल्याने संपूर्ण बस जवळपास जळून खाक झाली. मात्र सुदैवाने चालकाच्या सतर्कतेने या बसमधील सर्व प्रवासी सुखरुप बचावले.

प्राप्त माहितीनुसार बुधवारला रात्री ८ वा. दरम्यान नेर आगाराचीयवतमाळ- चिखलदराही (एमएच ४० एक्यू ६१६९ ) बस जात असताना घाट वळणात मोथा गावाजवळ अचानक पेटली. चालकाच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ बस थांबवून सर्व प्रवाशांना तत्काळ सुखरुप बाहेर काढले. आणि पाहता पाहता सर्व बस आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. घटनेची माहिती मिळताच चिखलदरा एसएचओ पिडूकर हे ही त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले.

धावत्या बसमधील इंजिन जवळ अचानक आग लागल्याने चालक हुकूम चौहान व वाहक गोविद लांजेवार यांनी सतर्कता दाखवत तत्काळ बस थांबवून प्रवाशांना सुखरूप बसमधून खाली उतरवले. तर शेख नसीर ठेकेदाराने आग विझविण्यास मदत केली. चालत्या बसला अचानक आगलागल्याची बातमी सोशल मीडियाच्या माध्यमातून शहरात वाऱ्यासारखी पसरली. हे ऐकून शहरातील समाजसेवेसाठी सदैव तत्पर असलेले शेख नासीर अब्दुल गनी यांनी आपला वैयक्तिक पाण्याचा टँकर पाठवून आग आटोक्यात आणण्यास मदत केली. सुमारे २ तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र तोपर्यंत सर्व बस जळून खाक झाली होती.



# विदर्भाच्या राजाची भव्य मिरवणूक २३ सप्टेंबरला

## विविध ढोल पथकांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** दरवर्षीप्रमाणे यंदाही विदर्भाच्याराजाची भव्य मिरवणूक २३ सप्टेंबरला निघणार आहे. या मिरवणूक मार्गावर रांगोळी काढली जाणार आहे. विविध ढोल पथकांचा त्यात समावेश राहणार असून त्यांना तीन निकषांवर पुरस्कार दिला जाणार आहे, अशी माहिती मंडळाचे सर्वेसर्वा दिनेश बूब यांनी बुधवारी (ता. १८) पत्रपरिषदेत दिली.

विदर्भाचा राजाच्या मिरवणुकीत १५ ढोल पथक सहभागी होतील. मिरवणुकीचे थेट प्रक्षेपण सिटी न्यूज व युसीएनद्वारे करण्यात येणार आहे. मिरवणुकीत होणारी गर्दी लक्षात घेता, वयोवृद्ध भक्त व गरोदर महिला व बालकांनी मिरवणुकीत प्रत्यक्ष सहभागी होण्याऐवजी घरी बसूनच टिव्हीवर मिरवणूक बघावी, मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांनी आपापली आभूषणे व मोबाईल सांभाळावे, असे आवाहन दिनेश बूब यांनी केले.

एचडी आर्ट संस्थेद्वारे मिरवणूक मार्गात अखंड रांगोळी काढण्यात येईल. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे सर्व ढोल ताशे पथकांचे निरीक्षण करण्यात येईल. या निरीक्षणासाठी पाच लोकांची समिती गठित करण्यात येणार आहे. उत्कृष्ट वादन, शिस्तबद्धता, सादरीकरण या निकषांवर तीन पुरस्कार देण्यात येणार आहे. पुढील वर्षी एका उत्कृष्ट भजनसंध्या कार्यक्रमकरण्यात येणार आहे, अशीही माहिती यावेळी देण्यात आली. स्वराज पथक, छत्रपती पथक, रामराज्य पथक, शौर्य रुद्र पथक, - जगदंब पथक, वक्रतुंड पथक, शिवराज्य पथक, वाद्य सम्राट पथक, बाबुळगाव ढोल पथक, धामणगाव ढोल पथक अमरावती), शिवसाम्राज्य पथक, दैवत पथक वर्धा, हिंद हिंद वीर स्वराज्य पथक परतवाडा, शिवराष्ट्रपथक पांढरकवडा, शिव साम्राज्य पथक नागपूर या पथकांचा मिरवणुकीत समावेश राहणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पत्र परिषदेला मंडळाचे अध्यक्ष दिनेश बुब यांच्यासह दैनिक अमरावती मंडलचे संपादक अनिल अग्रवाल, दैनिक हिंदुस्थानचे संपादक विलास मराठे, ईगल हॉटेलचे संचालक बिट्टू सलुजा, कार्यकारी अध्यक्ष भैय्यासाहेब पवार, बालाजी मंदिराचे अध्यक्ष महेश साहू, शिवसेनेचे (उबाठा) युवा नेते धीरज श्रीवास, मंडळाचे सचिव विनोद डागा व अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुल गांधी यांनी पुन्हा बोलू नये म्हणून चटके द्या म्हटलं..

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** - राहुल गांधींच्या जिभेला चटके द्यायला हवं असं वादग्रस्त विधान भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी केलं होतं. या विधानानंतर अमरावतीच्या राजापेठ पोलिसात त्यांच्याविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आलाय.. त्यानंतर पुन्हा एकदा मुंडेंची प्रतिक्रिया समोर आली आहे राहुल गांधी यांनी पुन्हा बोलू नये म्हणून चटके द्या म्हटलं असा हल्लाबोल अनिल बोंडे यांनी चढवलाय.. निश्चितपणे त्यामध्ये कोणतीही हिमसा नाहीये कोणी एखादा पोरगा खोटं बोलत असेल तर आई सुद्धा चटके देते असे स्पष्टीकरण अनिल बोंडे यांनी दिलाय..



## अनिल बोंडेंचा पुन्हा जोरदार हल्लाबोल..

## यशोमती ठाकूर राहुल गांधींच समर्थन कशा करू शकतात, अनिल बोंडेंचा सवाल

## राहुलच नव्हे तर नेहरू, राजीव गांधीदेखील होते आरक्षणविरोधी - -चंद्रशेखर बावनकुळे

राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन आरक्षणाविरोधी भूमिका मांडून कोट्यवधी अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी व आदिवासी समाजाचा अपमान केला आहे. केवळ राहुलच नव्हे तर देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व माजी पंतप्रधान राजीव गांधी हेदेखील आरक्षणविरोधी होते.



राहुल गांधी यांच्या राज्यातील प्रचार सभांमध्ये जाऊन भाजप त्यांच्या आरक्षणाबाबतच्या भूमिकेवर जाब विचारेल, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपुरात बुधवारी ते पत्रपरिषदेदरम्यान बोलत होते.राहुल गांधी यांनी आरक्षणाला विरोध केला आहे. त्यांच्या पोटात होते ते ओठावर आले. काँग्रेसचा सुरुवातीलपासून आरक्षणाला विरोध आहे. मात्र लोकसभा निवडणुकीच्या काळात खोटा प्रचार करत मोदी सरकारची बदनामी केली आहे. आता जनता त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. ओबीसी समाजाचे नेते म्हणविणारे नाना पटोले हे राहुल गांधींच्य वक्तव्यावरून माफी मागणार आहे का असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला. राहुल गांधी यांच्या महाराष्ट्रात जिथे- जिथे सभा होतील त्या ठिकाणी त्यांनी आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा ओबीसी समाजासह अनुसूचित जाती जमाती समाजातील नागरिक त्यांचा निषेध करतील, असा इशारा बावनकुळे यांनी दिला.

# वरुड पेट्रोलपंपावरील लुटमार प्रकरणातील आरोपी जेरबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ वरुड**वरुड पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कुरळी मार्गावरील पेट्रोल पंपावर मंगळवारी (दि. १७) पडलेल्या दरोडा प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा व वरुड पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत तिघांना ताब्यात घेतले, तर फरार असलेल्या एकाचा शोध सुरू आहे. विशेष म्हणजे पेट्रोल पंपावरीलच एक कर्मचारी या घटनेचा मास्टरमाईंड आहे. मयुर राजकुमार ठाकरे (वय २१), सुरज ऊर्फ सुधिर प्रभाकर घोरपडे (वय २०), डिग्या ऊर्फ दिगंबर श्यामराव राऊत (वय २२) तिघेही रा. सुरळी, ता. वरुड अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या युवकांची नावे आहेत.मंगळवारी मध्यरात्री ५ ते ६ अज्ञातांनी पेट्रोल पंपाच्या कॅबिनमध्ये खिडकीतून प्रवेश करून आतमध्ये झोपलेल्या तीन कर्मचाऱ्यांना मारहाण करीत त्यांचे हातपाय बांधून तेथील लोखंडीकपाट तोडून रोख ५ लाख ३२ हजार ३७९ रुपये घेऊन पळ काढला होता. या प्रकरणी पेट्रोल पंपावरील कर्मचारी शंकर संपतराव दंडाळे (रा. मेंढी, ता. रूड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून क्रूड पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा नोंद केला. घटनेचे गांभिर्य पाहता, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी क्रूड पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हा उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. या प्रकरणी तपासासाठी एकूण चार पथके तयार करण्यात आली होती. दरम्यान पेट्रोल पंपावरील कर्मचारी प्रशिक सुभाष दंडाळे (२६, रा. कुरळी) याच्या जबाबात विसंगती आढळून येत असल्याने त्याला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्याने त्याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली. ही कारवाई एसपी विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोनि किरण वानखडे, अवतारसिंग चव्हाण, पोउनि नितीन चुलपार, नितीन इंगोले, दीपक दळवी, राजु मडावी, बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, सुनील महात्मे, रविंद्र अ बावणे, भुषण पेठे, सचिन मिश्रा, सुधिर बावणे, शकील - चव्हाण, निलेश डांगोरे, सै. अज अजमत, पंकज फाटे, अक्षय शेळके, प्रशांत राजस, मनोज टप्पे, सचिन भगत, किरण दहीवडे यांच्या पथकाने केली आहे.

# पूर्णाकाठावर निर्माल्य संकलन व स्वच्छता अभियायानाला उत्स्पूर्त प्रतिसाद!

## क्षात्रवीर प्रतिष्ठान व राष्ट्रिय हरित सेनेचा उपक्रम , २ ट्रॉली निर्माल्य संकलीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९चांदुर बाजार-** स्थानिक चांदूर बाजार तालुक्यातील कुरळ पूर्णा येथे पूर्णाकाठावर दरवर्षी प्रमाणे यावर्षीही पूर्णामाय निर्माल्य संकलन व स्वच्छता अभियायानाला यावर्षीही गणेश भक्तांनी उस्पूर्त प्रतिसाद दिला.यावर्षी सायंकाळ पर्यंत किमान २५०० घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. त्यासोबत निर्माल्य ही गोळा करण्यात आले. दरवर्षी निर्माल्य कमी प्रमाणात जमा होत आहे. यातून जनजागृती होत आहे.क्षात्रवीर प्रतिष्ठान व शंकर विद्यालय येथील राष्ट्रिय हरित सेना, माणुसकी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते.या उपक्रमाची सुरुवात सहा वर्षापासून करण्यात आली निर्माल्यमुळे नदीचे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी या अभियानाचे संयोजक डॉ तुषार देशमुख यांनी या अभियानाला सुरुवात केली. त्यानंतर निर्माल्य स्वीकारल्यास होणारे प्रदुषण कमी झाले.या अभियानात सह संयोजक व निसर्गमित्र सदाशिव देवताळे, प्रतिक देशमुख, प्रणय तरारे, रोशन नांद्रेकर यांचे विशेष परिश्रम आहेत. या उपक्रमाला सामाजिक वनीकरण व त्यांचे कर्मचारी यांचेही पाठबळ मिळाले. चांदूर बाजारचे तहसीलदार रामदास शेळके ,ठाणेदार सूरज बोंडे, सरपंच डॉ मुकुंद मोहोड, पोलीस पाटिल संदीप मोहोड, सामाजिक वनीकरण चे वाटाणे, प्रसिध्द गझलकार नितीन देशमुख,जेष्ठ पत्रकार सुरेश सवळे, सागर सवळे,सुयोग गोरले यांनी भेट देवून कौतुक केले. या अभियानाकरिता मुख्य संयोजक डॉ तुषार देशमुख, संयोजन समितीचे सदाशिव देवताळे, प्रतिक देशमुख, प्रज्वल ठाकरे, प्रणय तरारे, रोशन नांद्रेकर यांच्यासह शंकर विद्यालय राष्ट्रिय हरित सेनेचे अजित कासदेकर, संभाजी सांगोले,स्मित कापसे, रुपेश चव्हाण, आर्यन गेडाम, नैतिक शिंगाडे,वेदांत पाखरे, अंकूश चौधरी, प्रणव गवई, ईश्वर हाते यांनी बॅनरवाला ग्रुप चे दिगांबर नांद्रेकर,नेहल तरारे,अविनाश अमझरे समजीक वनीकरण कर्मचारी व पंकराजा बिल्डिंग मटेरियल चे निलेश पळसपगार, नंदू सोनोने, घनश्याम भोरगडे उमेश भोरगडे आशिष मोहोड,गवई, तायडे उपस्थित होते.



# मुख्यमंत्रिपद हवेच म्हणून काँग्रेसपेक्षा १० जागा कमी घेण्यास उद्धवसेना तयार

## मविआत काँग्रेसचा १०५ तर शरद पवार गटाचा ८८ जागांचा प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मुंबई**

कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्रिपद हवेच, हा आग्रह नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी म्हटले होते. प्रत्यक्षात त्यांनी हा आग्रह अजिबात सोडलेला नाही, असे मविआच्या जागावाटप बैठकीत स्पष्ट झाले. मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसपेक्षा १० जागा कमी घेण्याची तयारी उद्धवसेनेने जागावाटप बैठकीच्या पहिल्या दिवशी म्हणजे १८ सप्टेंबर रोजी दाखवली. काँग्रेसने १०५, उद्धवसेनेने ९५ आणि शरद पवार गटाने ८८ जागा लढवाव्यात असा प्रस्ताव त्यात मांडला गेल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठकीत जागावाटपावर चर्चा झालीच नाही, असा दावा केला. आणखी दोन दिवस हे बैठकांचे सत्र चालणार आहे. दरम्यान, बैठकीला येण्यासाठी काँग्रेसचे राज्यातील नेते तयार नव्हते. त्यामुळे उद्धवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी आगपाखड केली.

मविआतील नेत्यांनी २८८ जागांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये काँग्रेस विदर्भात मजबूत स्थितीत आहे. उद्धवसेना मुंबईसह कोकणात तर राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात आपली ताकद दाखवण्याच्या मानसिकतेत आहे. त्यामुळे विधानसभेमध्ये मविआलच बहुमत मिळेल, असे प्रास्ताविक करून सुरूवात झाली. काँग्रेसने ११५ जागांवर दावा केला आहे. मात्र, राहुल गांधींच्या आदेशानुसार ते १०५ जागांवर थांबतील, असेही सूत्रांचे म्हणणे आहे.

काँग्रेसचे नेते फारच व्यग्र, तारखांवर तारखा देत आहेत जागा वाटप बैठकीची तारीख, वेळ, ठिकाण आधी कळवूनही काँग्रेसचे नेते वेळेवर पोहोचले नाही. त्यामुळे उद्धवसेनेचे खासदार संजय राऊत म्हणाले की, काँग्रेस पक्ष सध्या खूप व्यस्त आहे, तरीही आम्ही हे प्रकरण संपवावे, यासाठी आज त्यांना बोलावले. तरीही ते तारखांमागून तारखा देत आहेत.

**पाच वर्षांत २९ जागा कमी–** २०१९मध्ये उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील शिवसेना, भाजपने युती म्हणून विधानसभा लढली होती. त्यात शिवसेनेला १२४ जागा मिळाल्या होत्या. आता मविआमध्ये उद्धव ठाकरे २४ कमी जागा लढण्यास तयार आहेत.

### काँग्रेसच्या राज्यस्तरीय नेत्यांचा वाढता विरोध

राहुल गांधी यांनी मुख्यमंत्रिपदासाठी उद्धव ठाकरे यांना आश्वासन दिले असले तरी काँग्रेसचे राज्यस्तरीय नेते त्यास अजिबात तयार नाही. मविआ सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात उद्धव यांचा अनुभव चांगला नव्हता. महत्वाचे म्हणजे लोकसभेला उद्धवसेनेचे खासदार मुस्लिम आणि दलितांनी एकगठ्ठा मतदान केल्यानेच निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रिपद कशाला, असे नेत्यांचे म्हणणे आहे.



### जागावाटपावर ठोस चर्चा झालीच नाही : पटोले

राहुल गांधींविषयीच्या वक्तव्यांवर राज्यभर आंदोलन करण्याचे बुधवारच्या बैठकीत ठरले. जागा वाटपावर ठोस चर्चा झाली नाही. आठ दिवसानंतर ती होईल. मुंबईतील ९ जागांवर अद्याप एकमत झाले नाही. – नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस

### उद्धवसेना पुन्हा एकदा आक्रमक झाल्याचे दिसले

सूत्रांनी सांगितले की, ६ ते ८ ऑगस्ट दरम्यान उद्धव यांनी दिल्लीत राहुल गांधी यांची भेट घेतली. मुख्यमंत्रिपदासाठी माझाच चेहरा द्यावा, अशी मागणी केली. त्यावर प्रचारात ही बाब समोर आणली जाईल, असे सांगण्यात आले होते. त्यानंतर शरद पवारांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची घाई नाही, असे म्हटले. त्यामुळे शांत झालेली उद्धवसेना या बैठकीत आक्रमक झाल्याचे दिसले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जागतिक कृषी पुरस्काराने गौरव; शेतकऱ्यांबद्दल काय म्हणाले?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई –** पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या कामाची दखल घेऊन 'वर्ल्ड ग्रीकल्चर फोरम'कडून त्यांना जागतिक कृषी पुरस्काराने काल सन्मानित करण्यात आलं. फोरमचा हा दुसराच पुरस्कार असून हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्यमंत्री शिंदे यांना प्रदान करण्यात आला. जागतिक बांबू दिनाच्या औचित्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आलं होतं. एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाराष्ट्र कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम'चे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंगे, फोरमचे आशिया प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. विलियम्स दार, आफ्रिका प्रांताचे उपाध्यक्ष प्रो. लिंदवे सिंबादा, अमेरिका प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. केनिथ क्वीन्, फोरमचे भारतातील संचालक तथा इंडियन चेंबर ऑफ फूड ग्रीकल्चरचे अध्यक्ष डॉ एमजे खान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमचा जागतिक कृषी पुरस्कार हा महाराष्ट्रातील राबणाऱ्या शेतकऱ्यांना अर्पण करत असल्याचे नमूद करून महाराष्ट्राला शेतीच्या क्षेत्रातही पहिल्या क्रमांकाचे राज्य बनवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं.जागतिक कृषी पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांवर जगाने मोहोर उमटवली आहे. महाराष्ट्राने नेहमीचे भारतातील



कृषी क्षेत्रात प्रयोगशीलता राबवल्याचे या पुरस्कारामुळे सिद्ध झाले, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करण्यात आलेल्या जागतिक कृषी पुरस्कारांबद्दल कौतुकोद्गार काढले आहेत.

# ...तर मला फासावर लटकवा

## जयच्या मृत्यूचं राजकारण करू नका; अमोल मिटकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई –** जय मालोकर या तरुणाचा मृत्यू गंभीर मारहाणीमुळे झाला हे पोस्टमोर्टम रिपोर्टमधून समोर आलंय. हे फार वेदनादायी आणि दुर्दैवी आहे. या प्रकरणी मी जर दोषी असेल, माझ्या कुणी कार्यकर्त्याचा हात असेल तर आम्हाला थेट फासावर लटकवा अशी आमची मागणी आहे. या प्रकरणी राजकारण करू नये असं मोठं विधान आमदार अमोल मिटकरी यांनी केले आहे.मुंबईत राष्ट्रवादीच्या बैठकीनंतर मिटकरींनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, अकोला जिल्ह्यातील मनसेचा २३ वर्षीय कार्यकर्ता ज्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला असं दाखवले होते, मात्र पोस्टमोर्टम रिपोर्टमध्ये जयचा मृत्यू गंभीर मारहाण आणि दुखापतीमुळे झाल्याचं समोर आले. हे फार वेदनादायी आणि दुर्दैवी चित्र आहे. जयच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी आणि जयच्या मृत्यूची चौकशी या दोन्ही मागण्या सरकारने मंजूर केल्या पाहिजेत. याबाबत कुटुंबाने रितसर तक्रार पोलीस ठाण्यात द्यावी. मी जर दोषी असेल, माझ्या कुणी






कार्यकर्त्याचा हात असेल तर आम्हाला थेट फासावर लटकवा अशी आमची मागणी आहे. आम्हाला दोषी ठरवून जे काही गुन्हे असतील ते घेण्याची आमची तयारी आहे. परंतु यात जे कुणी दोषी असतील मग आम्ही असो वा त्यांच्यातील कुणी या प्रकरणी राजकारण करू नये. अमोल मिटकरी जर दोषी असेल तर त्याला भरचौकात फासावर द्या असं त्यांनी म्हटलं. तसेच जे कुणी आरोपी असतील. जय त्याठिकाणी आंदोलनात होते, तिथे त्यांना सहभागी करण्याचा प्रयत्न झाला. पूर्ण सीसीटीव्ही फुटेज बघा, त्या विद्यार्थ्याने आमच्या वाहनावर हल्ला केला नव्हता. तो मागे उभा होता. परंतु त्याच्या मृत्यूच्या शेवटपर्यंत काय काय झाले हे सत्य कुटुंबासमोर आले पाहिजे. जो कोणी दोषी असेल त्याला कठोर शासन झाले पाहिजे. जय मालोकर कुटुंबाने जी मागणी केली ती रास्त असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. त्यांच्या कुटुंबाला पूर्ण वेळ संरक्षण द्यावे अशी मागणीही आमदार अमोल मिटकरींनी केली. दरम्यान, मला यात राजकारण करायचं नाही. जय मालोकर हा विद्यार्थी होता. आमच्या वाहनावर हल्ला करण्याचा त्याचा हेतू नव्हता. पण कुणीतरी बैठकीत आले, आंदोलनानंतर जय नेमका कुणासोबत होता, कुठे कुठे त्याला नेले गेले या सर्व गोष्टीच्या चौकशीची मागणी कुटुंब करत असेल तर ती मागणी रास्त आहे. आम्हाला या प्रकरणी पक्षीय राजकारण करायचे नाही. जयला कुणी मारलं हे जनतेसमोर सत्य येऊ द्या. सर्वांचे कॉल डिटेल्स काढा. त्याच्या संपर्कात कोण कोण होते, जय मालोकरच्या कुटुंबाला न्याय भेटला पाहिजे असं अमोल मिटकरींनी मागणी केली.

# महिला मुख्यमंत्रीवरुन राजकीय चर्चा जोरात

## वर्षा गायकवाड यांच्या विधानानंतर मविआत वेगवेगळी मते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई :–** पुरोगामी महाराष्ट्रात महिलेला मुख्यमंत्रिपद मिळायला हवे. काँग्रेसमध्ये माझ्यासह चार–पाच जणींच्या नावाचा विचार होऊ शकतो. मित्र पक्षांतील सुप्रिया सुळे, रश्मी उद्धव ठाकरे यांच्यापैकी कोणाला मुख्यमंत्री केले तरी चालेल, असे विधान मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी केल्याने पहिली महिला मुख्यमंत्री मिळणार का, ही चर्चा सुरू झाली आहे. या स्पर्धेत काही महिला नेत्या असल्याचे त्या–त्या वेळी चर्चेत आले. पण, प्रत्यक्ष संधी कोणालाही मिळाली नाही. मी जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहे, असे विधान भाजपच्या पंकजा मुंडे यांनी पूर्वी केले होते. आता वर्षा गायकवाड यांनी स्वतःसह सुप्रिया सुळे, रश्मी ठाकरे यांची नावे या पदासाठी घेत 'महिला कार्ड' पुढे केले आहे.



**संधी दिल्यास मलाही आवडेल...**

पक्षाने संधी दिल्यास मुख्यमंत्री झालेले मलाही आवडेल, असे विधान वर्षा गायकवाड यांनी बोलताना केले. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा महाविकास आघाडीने आधी जाहीर करावा, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली होती. काँग्रेस, शरद पवार गटाने त्यास विरोध दर्शविला होता. आता गायकवाड यांनी महिलेला ती संधी द्यावी, असा आग्रह धरला आहे. महायुती सरकारने एकाच महिलेला मंत्रिपद दिले. मविआ सरकारमध्ये दोघी कॅबिनेट व एक राज्यमंत्री होत्या, असे त्या म्हणाल्या.रश्मी ठाकरे यांनी राजकारणात कधीही रस घेतलेला नाही. त्या नेहमी त्यांच्या पतीसोबत असतात. याचा अर्थ त्या राजकारणात आहेत, असा होत नाही. राज्यात महिला मुख्यमंत्री व्हायला पाहिजेत. पण, कारण नसताना रश्मी ठाकरे यांचे नाव त्यात घेऊ नये.

# कृषी विद्यापीठात शेतकऱ्यांना पाहता येणार पीक प्रात्यक्षिके: मुख्यमंत्री शिंदे, केंद्रीय कृषी चौहान यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अकोला–** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने यंदा खरीप हंगामातील पिके शेतकऱ्यांना पाहता यावी, आधुनिक तंत्रज्ञान पाहता यावे, सोबत नेता यावे व तसे प्रयोग आपल्या शेतावर करावे, या हेतूने शिवार फेरीचे आयोजन केले आहे. यंदा अकराशे हेक्टरवर विद्यापीठाने पीक प्रात्यक्षिक घेतले आहे. ते अनुभवण्याची संधी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली आहे, या शिवार फेरीचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते होणार आहे, सोबतच उपमुख्यमंत्रीद्वय यांची उपस्थिती असेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांना शिवार फेरीची मेजवानी विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली आहे. एक लाख शेतकरी या शिवारफेरीचा लाभ घेतील असा विश्वास कुलगुरू डॉ. गडाख यांनी व्यक्त केला. हजेरी लावणाऱ्या शेतकऱ्यांना विद्यापीठाचे वाहनांमधून



विद्यापीठाच्या संपूर्ण प्र क्षेत्र दाखवण्यात येते. शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी प्रत्येक वाहनांमध्ये एका गाईडचीही सोय केलेली आहे. विशेष म्हणजे एकाच ठिकाणी २० एकर क्षेत्रावर २०७ पीक प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना पाहता येतील. तुलना करता यावी म्हणून काही खासगी कंपन्यांचेही वाण आणि तंत्रज्ञान या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आले आहे. फुले, भाजीवाला, सेंद्रिय शेती, बेकरी प्रक्रिया, कापणी पश्चात तंत्रज्ञान, मिरची संशोधन केंद्र, ज्वारी संशोधन केंद्र, कडधान्ये, तेलबिया पिके, कापूस, संत्रावर्गीय फळे, भरड धान्य, सौर कुंपण आणि हळद लागवड, कोरडवाहू शेती, पशू आदीसंदर्भज्ञत माहिती शेतकऱ्यांना पाहता येईल, अशी माहिती डॉ. गडाख यांनी दिली. पत्रकार परिषदेला संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे उपस्थित होते.

शेती शिवार फेरीचे तीन दिवसांचे असे राहील वेळापत्रक २० सप्टेंबर : अकोला, वाशीम, बुलडाणा आणि अमरावती जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित राहणार आहेत. पहिल्या दिवशी मुख्यमंत्री, केंद्रीय कृषी मंत्री यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहतील. २१ सप्टेंबर : वर्धा, यवतमाळ, गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यातील शेतकरी शिवार फेरीला येणार आहेत. या कार्यक्रमाला अभिनेता आमिर खान संपूर्ण शिवारफेरी पाहणार आहेत व शेतकऱ्यांसोबत संवाद साधणार आहेत. २२ सप्टेंबर : भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी येतील.

# संत्रा वाहतूक करणाऱ्या ट्रकचा टायर फुटून १३ मजूर जखमी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ पथ्रोट–** वलगाव येथून संत्री घेऊन खोलापूर–दर्यापूर मार्गे अंजनगावकडे निघालेल्या मिनी ट्रकचा लखापूर फाट्याजवळ टायर फुटून बुधवारी १८ रोजी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात १३ जण किरकोळ तर ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताच्या वेळी २० मजूर संत्र्याच्या कैरेटवर बसून प्रवास करत होते. लखापूर फाट्यानजीक मुख्य रस्त्यावर ४०७ मिनी ट्रक मागील टायर अचानक फुटल्याने अनियंत्रित झाल्यामुळे उलटला. या अपघातात एकूण १६ मजूर जखमी झाले आहेत. जखमीमध्ये संतोष सुधाकर फरकुंडे (४०), अक्षय देवानंद दांडगे (२७), निखील संजय राऊत (१९), मोज अशोक दांडगे (२८), अविनाश ज्ञानेश्वर कुरम (२४), हितेश ईशवरदास दांडगे (२७), संक्षम सुधाकर दांडगे (२०), अमोल गजानन राऊत (२५), प्रवीण गजानन धारपवार (२३) सर्व राहणार पथ्रोट,गोपाल किशन मरसकोल्हे (२२), सीमा आमलाल वर्धे (१९), अंबिका प्यारेलाल कवरे (१९) तिघेही रा.शिनवाडा, सुखदेव नंदू पंदरम (२५), सजनी नामदेव सकामे (१९) दोघेही रा.कोपीठाणा, हिरवंती नकर उईके (१६) रा. हिरादेवी, सैय्यद अकबर सय्यदकासम (४८) रा. कापूसतळणी अशी जखमींची नावे आहेत. घटनेची माहिती मिळताच शिंदे शिवसेना मदत कक्षांचे राहुल भुंबर व सहकाऱ्यांनी सर्व जखमींना रुग्णवाहीकेत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. एकूण जखमीपैकी संतोष सुधाकर फरकुंडे, गोपाल किशन मरसकोल्हे, सुखदेव नंदू पंदरम हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी दर्यापूर पोलिसांनी भेट देऊन पंचनामा केला आहे.

# घरगुती भांडी सेट योजनेसाठी दररोज महिलांची पहाटेपासूनच गर्दी

## अधिकारी बेपत्ता, एका अधिकाऱ्यांकडे तीन ते चार जिल्ह्यांचा प्रभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** जिल्ह्यात घरकाम करणाऱ्या महीलांना घरगुती भांडी सेट योजना सुरू असल्याने कामगार उपायुक्त कार्यालयात नोंदणी करीता महिलांची चिकार गर्दी होत आहे. मात्र, कार्यालयात एकही वरीष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याचे वास्तव पाहावयास मिळाले. महत्वाची बाब म्हणजे येथील तीनही महत्वाच्या अधिकाऱ्यांकडे एकापेक्षा अधिक जिल्ह्यांचा प्रभार आहे. त्यामुळे गत काही दिवसांपासून येथे महीलांची गर्दी होत असताना अद्यापही याचे नियोजन या कार्यालयाकडून करण्यात आले नाही. त्यामुळे कोसो दुरवरून येणाऱ्या महिलांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.शासनाकडून अलीकडे कामगारांकरीता विविध योजना सुरू असताना घरकाम करणाऱ्या महीलांकरीता नुकतीच घरगुती भांडी सेट योजना सुरू केली आहे. याकरीता महिलांना आधी नोंदणी करावी लागत आहे. ही योजना जून पासून सुरू करण्यात आली असून याकरीता जिल्हास्तरावर कामगार उपायुक्त कार्यालयातून ऑफलाइन अर्ज स्विकारल्या जात आहे. त्यामुळे शंभर ते दिडशे किलोमिटर अंतरावरून शेकडो महीला पैसे खर्च करून या कार्यालयात नोंदणीकरीता येत आहेत. बऱ्याच महीला मुलाबाळासह या कार्यालयात येत असल्याने तासंतास त्यांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांची चांगलीच गैरसोय होत आहे. मागील दोन ते तीन महीन्यांपासून येथे गर्दी होत असताना मात्र या गर्दीचे नियोजन केल्याचे दिसून येत नाही. महत्वाची बाब म्हणजे येथे अधिकारीच दिसून येत नाही. अशीच परिस्थिती दररोज पाहावयास मिळते. या कार्यालयात महिलांची चिकार गर्दी सध्या होत आहे.

# मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर यांच अमरावतीत आगमन... अमरावती विश्रामगृहात पोलिसांनकडून सलामी....



मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहे, दरम्यान अमरावतीच्या विश्रामगृहात राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर यांच आगमन झाल्यानंतर त्यांच अमरावती शहर पोलिसांकडून स्वागत करण्यात आलं तर शहर पोलिसांनी त्यांना मानवंदना देत सलामी दिली,त्यांनंतर राज्यपालचंद्रशेखर एच. विजयाशंकर हे सावंगा विठोबा येथे धनगर बेडा येथे कार्यक्रमासाठी रवाना झाले.

# डिजे गुलाल ढोल ताशे याला फाटा देत वारकरी दिंडीने विसर्जन

## राधे गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीने वेधले नांदगाव वासीयांचे लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नांदगाव खंडेश्वर**

शहरातील प्रसिद्ध असलेले राधे गणेशोत्सव मंडळाने गुलाल डिजे ढोल ताशे याला फाटा देत पारंपारिक वारकरी दिंडी महापुरुषांच्या वेशभूषेने गणपती विसर्जन मिरवणुकीने नांदगाव वासीयांचे लक्ष वेधले असून शांतता प्रिय वातावरणात गणेशोत्सव साजरा केला शहरातील राधे गणेशोत्सव मंडळ दहा दिवस विविध सामाजिक धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करत असते आणि गणपती विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक पद्धतीने संस्कृतीचे जतन करून डिजे ढोल ताशे याला फाटा देत गुलाल न उधळता वारकरी दिंड्या लहान मुलींचे लेझीम पथक विशेष आकर्षण होते सात बैल जोड्याचां रथ ज्यात गणेशाची मूर्ती विराजमान होती, महिलांची दिंडी,छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू रामचंद्र,यांची देखणी मूर्त,तुकडोजी महाराज संत गाडगेबाबा डॉ बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले लोकमान्य टिळक स्वामी विवेकानंद अण्णाभाऊ साठेशहीद विकास उईके यांचे छायाचित्रे इत्यादी पारंपरिक पद्धतीचे देखावे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घातलेला विशिष्ट पोशाख अतिशय शांतता प्रिय वातावरणात गणपती विसर्जन मिरवणूक पार पडली यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश मारोटकर यांचेसह मंडळाचे अध्यक्ष अक्षय हिवराळे भुमेश्वर गोरे निलेश मारोटकर गजानन तायडे अनिकेत गटूले प्रेम हिवराळे महेश वानखडे पवन जेवडे मनीष चौधरी मयूर वानखडे आकाश मंगळे ओम रुमाने श्रीकृष्ण कांबळे निलेश झिमटे जय मोकळेकर आदित्य अवचारे श्याम चौधरी पवन मोकळेकर बबलू सोनोने इत्यादी उपस्थित होते दरम्यान न प चे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांनी मिरवणूकीत भेट दिली ठाणेदार सुनील सोळंके पोलीस उपनिरीक्षक विशाल तुळजेवार दर्शन दिकोंडवार पोलीस कर्मचारी सतीश गावंडे प्रशांत पकळे निखिल मेटे राजेश हिरेकर सतीश राठोड इत्यादींनी चोख बंदोबस्त सांभाळून नांदगावचा गणेशोत्सव शांतपणे पार पडला.

# आनंदराव अडसूळ यांची अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल दर्यापुरात जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९दर्यापूर**



हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे वारसदार महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षासाठी अहोरात्र काम करणारे खा.आनंदराव अडसूळ साहेबांना अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केल्या बद्दल साहेबांचे आभार मानून दर्यापूर मध्ये आनंदराव अडसूळ साहेबाना अध्यक्ष पद मिळाले तसेच वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या वतीने दर्यापूर मध्ये लाडू आणि पेढे वाटून फटाके फोडुन शिंदे साहेबाचे गाणे लावून जल्लोष करण्यात आला त्यावेळी सहसंपर्कप्रमुख रवीजी गणोरकर राजेंद्रजी गायगोले विधानसभा संघटक वैभव भांडे तालुकाप्रमुख महेंद्र भांडे शहर प्रमुख तुषारजी चौधरी युवा तालुकाप्रमुख सोपान वडतकर युवा सेना शहर प्रमुख अभिजीत प्रांजळे उप तालुका प्रमुख सुरज पाचखंडे उपशहर प्रमुख संजय राणे राहुल जी गावंडे नागोराव केणे विलास पाटील साखरे लकी गावंडे स्वप्निल मात्रे श्रीकांत फलके गोपाल तराळ शरद अरबट सुधीर अरबट कृष्णा तायडे श्रीकृष्ण झापे सागर गेठे राहुल भुंबर हेमंत उमाळे शेखर डाहाके विशाल पोरे संकल्प भेले शैलेश धर्माळे सौरभ देशमुख सागर पाचखंडे पंकज मात्रे श्रिजित सुरजुशे आदित्य खराटे शिवकुमार कैसर सुमित हिवसे अनिकेत सोनोने विशाल पोरे दिपक एकादशे बंडु कोकणे चेतन घोगरे उपस्थित होते.

# प्रशासनिक ग्रुपमधून बाहेर पडून शिक्षकांचे असहकार आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**



नवीन संचमान्यता व कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शिक्षकांची करण्यात येणारी भरती रद्द करावी, यासारख्या विविध मागण्यांसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा बंद ठेवून २५ सप्टेंबर रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यापूर्वी अमरावती जिल्हातील मंगळवारी शिक्षकांनी काळ्या फिती लावल्या तर बुधवारपासून व्हॉट्सअॅप प्रशासनिक ग्रुपमधून बाहेर पडून असहकार आंदोलन सुरू करण्यात आले आहे. राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणात चुकीचे धोरण राबवले असल्याचा आक्षेप घेत राज्यातील शिक्षक संघटना आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे दिसत आहेत. त्यासंदर्भात राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या आंदोलनात सहभागी नेरपिंगळाई येथील शिक्षक व शाळा समितीचे पदाधिकारी,बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. नवीन संचमान्यता व कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शिक्षकांची करण्यात येणारी भरती रद्द करावी, यासारख्या विविध मागण्यांसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा बंद ठेवून २५ सप्टेंबर रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय शिक्षक संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांच्या सोडवणुकीकडे दुर्लक्ष केले आहे.

दुसरीकडे १५ मार्च संचमान्यता व ५ सप्टेंबरचा २० अथवा २० पेक्षा कमी पटसंख्येच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील एक शिक्षक पद बंद करून कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शिक्षक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही निर्णयाच्या परिणामी विद्यार्थ्यांचे शिक्षणच बंद होण्याचीदर्जेदार शिक्षणापासून विद्यार्थी राहणार वंचितअशाप्रकारच्या शासन धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा बंद करून खाजगीकरण करणे आणि विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याच्या शासन धोरण असल्याचा आरोप केला आहे. काही विद्यार्थ्यांचे जन्मतारखेचे प्रमाणपत्र नसल्याने आधार कार्ड निघत नाही. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक संच निर्धारणासाठी व योजनांच्या लाभासाठी ग्राह्य न धरण्याची शासनाची भूमिका अचंबित करणारी आहे.१५मार्च व ५सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करावा आणि शाळा,विद्यार्थी,शिक्षक यांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात यावे या व इतर मागण्याकरीता अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर २८सप्टेंबरला मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन अमरावती जिल्हातील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (मा.आ.शिवाजीराव पाटील प्रणीत),महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ( संभाजीराव थोरात प्रणीत), महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती , पुरोगामी शिक्षक समिती , शिक्षक परिषद ,आदर्श शिक्षक समिती , आखिल भारतीय शिक्षक संघ , शिक्षक सेना , शिक्षक भारती, पदवीधर शिक्षक संघटना, प्रहार शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य , म.रा.दिव्यांग शिक्षक संघटना, एकल शिक्षक सेवा मंच व इतर संघटनांनी केल्याचे अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीने कळविले आहे.

# पोषण आहाराचे बारा मेन्यू शिक्षकांसाठी ठरत आहे डोकेदुखी साहित्याचा नाही पत्ता : हिशेब ठेवणार तरी कोण?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**



इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत आठवडाभर दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी आता शिक्षण विभागाने १२ मेन्यूचे प्रकार ठरवून दिलेले आहेत. प्रत्येक दिवशीचे मेन्यू कार्ड शिक्षक, मुख्याध्यापकांना दिले आहे. मुलांना पोषण आहार मिळत असला तरी १२ मेन्यू शिक्षकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत.

विद्यार्थ्यांना पोषण आहारात नियमित खिचडी दिली जात असल्यामुळे आता आहारात वैविध्य आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून वैविध्यपूर्ण पाककृतींचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून मेन्यूचा निर्णय चांगला असला तरी कडधान्य, तेल, मसाले, तांदूळ यांचा हिशेब ठेवावा लागणार आहे. तो कसा ठेवावा, असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. शिक्षण विभागाने त्याविषयी कोणतेही मार्गदर्शन केले नसल्याचे जिल्हा परिषदेच्या अनेक शिक्षकांनी सांगितले. शासनाने शालेय पोषण आहारासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करण्याची मागणी आहे.नाचणीसत्व, दूध पावडर, साखर, गूळ, सोयाबीन वडी, कांदा, लसूण, तेल, जिरे, कडधान्य आदी साहित्याचा पुरवठा झालेला नाही. दिवसभरातून तीन वेळा मुलांना नाचणी सत्व, तांदळाची खीर, पुलाव, मोड आलेले कडधान्य द्यावे लागेल. नाचणी सत्व हे अन्नधान्य महामंडळाकडून पुरविले येणार आहे.



कोणतेही साहित्य न देताच नवीन पाककृती करण्याचे आदेश दिले आहे. यातील अनेक पदार्थ न टिकणारे आहेत. शाळेमध्ये वस्तू ठेवण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याने शिक्षकांना विविध अडचणीला सामोरे जावे लागणार आहे. पोषण आहारासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करावी.

**– राजेश सावरकर, शिक्षक**

**या आहेत पाककृती ?**

पोषण आहारात भाज्यांचा पुलाव, मसाले भात, मटार पुलाव, मूगडाळीची खिचडी, चवळी खिचडी, चणा पुलाव, सोयाबीन पुलाव, मसूर पुलाव, मटकीची उसळ, गोड खिचडी, मूग शेवगा, वरण–भात, तांदळाची खीर, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य आदी पदार्थांचा समावेश आहे.

# ‘ओटीपी’ अभावी लाडक्या बहिणींना सिलिंडरच मिळेना

## एचपी पे ॲपवरून बुकिंग आवश्यक सर्वसामान्यांकडे स्मार्ट मोबाईलच नाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अचलपूर**

राज्यातील युती सरकारने १ जुलैपासून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. सोबतच बहिणींना वर्षाला तीन सिलिंडर मोफतची घोषणा केली. मात्र, शासनाची मोफत सिलिंडरचे घोषणा हवेतच विरली असून दोन महिने लोटूनही शासनाने बहिणींना सिलिंडर देणे सुरू केले नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

असे असले तरी सिलिंडरसाठी एचपी पे ॲपवरून ग्राहकांना बुकिंग करून त्यांचा ओटीपी एजन्सीला देणे बंधनकारक केले आहे. अन्यथा सिलिंडर दिला जात नसल्याची ओरड महिलांमध्ये आहे. परिणामता सरळ साध्यापणाने मिळणारे सिलिंडर ओटीपीअभावी मिळत नसूनओटीपीअभावी बहिणींना सिलिंडरची हुलकावणी मिळत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

यासाठी प्रत्येक ग्राहकांकडे स्मार्टफोन असणे बंधनकारक असून दिवसभरात एका मोबाइलवरून एकच ग्राहकाची बुकिंग होते. असे असताना ग्रामीण भागातील बहुतांश महिलांकडे स्मार्ट फोन नाही. असला तरी बुकिंग करता येत नाही. त्यामुळे बुकिंग करून ओटीपी मिळवायची कशी व सिलिंडर घ्यायचा कसा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शासनाने उज्वला योजनेअंतर्गत घरोघरी प्रत्येक महिलांना सिलिंडरचे वितरण केले. सिलिंडरचे दर वाढविल्याने परिस्थिती नसतानाही महिलांनी कसेबसे करून त्याचा वापर करीत आहेत. कोणत्याही लाडक्या बहिणींची शासनाकडे मोफत सिलिंडरची मागणी केली नाही. केवळ विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवत मोफत सिलिंडरचे गाजर दाखविण्यात आले. सिलिंडर तर दिलेच नाही. उलट सिलिंडर वितरणाची पद्धती क्लिष्ट केली. त्यामुळे मायबाप सरकार मोफत तर देऊ नका; पण आहे ते तरी साधेपणाने मिळू द्या, अशी मागणी होत न आहे.

**ओटीपी ची अट रद्द करा**


उज्वला गॅसधारक व लालकार्डधारक सर्वसाधारण लाभार्थी यांच्या सबसिडीत मोठी तफावत असून जवळपास तीनशे रुपयांच्या फरकाने सबसिडी जमा होत असल्याने महिलांमध्ये रोष व्यक्त होत आहे. सर्व लाभार्थ्यांना समान सबसिडी द्यावी व ओटीपीची अट रद्द करावी. नाहीतर ओटीपीची जबाबदारी एजन्सीकडे द्यावी. अशी मागणी महिलांनी केली आहे.

# नैराश्य किंवा टेन्शन आले ? या टोल फ्री नंबरवर करा कॉल : टेलिमानस अनेकांना ठरतेय जीवनदायिनी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

मागील काही दिवसांमध्येनैराश्यग्रस्त किंवा चिंताग्रस्त असे मानसिक रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. अशांना योग्य मार्ग दाखविण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाने टेलिमानस टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून कोणत्याही व्यक्तीला आपल्या मानसिक स्वास्थ्यासंबंधीच्या समस्या मांडता येतात. त्याचे समुपदेशन करण्यात येते. त्यामुळे टेलिमानस हा अशा नैराश्यग्रस्त नागरिकांना संजीवनी ठरत आहे.

दरवर्षी मानसिक स्वास्थ्य बिघाडामुळे अनेक जण आत्महत्या करतात. काही जण तर घर सोडून कुठेही भरकटतात. अशा स्थितीत योग्यवेळी त्या रुग्णाला सल्ला मिळाला तर तो आत्महत्येपासून परावृत्त होऊ शकतो. यासाठी केंद्र शासनाने टेलिमानस हा प्रकल्प सुरू केला असून याद्वारे रुग्णांना आपल्या



समस्या टोल फ्री क्रमांकावर समुपदेशकांना सांगता येतात. त्यातून त्यांचे समाधानही केले जाते.

**टोकाचे पाऊल उचलू नका**

विविध कारणांमुळे मनात आत्महत्येचे विचार येत असतील तर ते मनातच दाबून ठेवू नये. ते इतरांजवळ व्यक्त करावेत. तेव्हाच त्यातून मार्ग काढता येऊ शकतो. जीव देऊन प्रश्न तर सुटणार नाही. उलट कुटुंबात अनेक समस्या निर्माण होतील. त्यामुळे व्यक्त होऊन समस्येची सोडवणूक करावी. टोकाचे पाऊल उचलू नये.

**समुपदेशकाची भेट घ्या**

प्रत्येक जिल्ह्यातील सामान्य रुग्णालयात मानसोपचारतज्ज्ञ तसेच समुपदेशक नियुक्त करण्यात आले आहे. मानसिक समस्या असेल तर समुपदेशकांची भेट घ्यावी. त्यांना आपल्या समस्या सांगा. यातून ते मार्ग काढून देतील.

**या टोल फ्रि नंबरवर करा कॉल**

आत्महत्येचे विचार मनात येत असतील तर केंद्र शासनाने उपलब्ध केलेल्या १४४१६ किंवा १८००८९१४४१६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, कॉल केल्यानंतर राज्यातील मुख्य सेंटरशी संपर्क होतो. त्यानंतर संबंधित यंत्रणेकडून रुग्णाच्या जिल्ह्यात कळविले जाते.

# मेघालयचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर पोहचले धनगर बेड्यावर

## जाणून घेतल्या मेंढपाळाच्या समस्या : धनगर बांधवांनी बेड्यावर दिला बेसन भाकरीचा पाउंचार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असून त्यांनी अमरावती जिल्ह्यतील सावंगा विठोबा येथील धनगर बेड्यावर जाऊन मेंढपाळांच्या समस्या जाणून घेतल्या, यावेळी त्यांचे धनगरी फेटा घालत धनगर बांधवांनी धनगरी नृत्य करत त्यांचे स्वागत केले.


मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर हे आज अमरावती दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी सावंगा विठोबा येथील धनगर बेड्यावर जाऊन मेंढपाळांच्या समस्या जाणून घेतल्या,

बेड्यावरील धनगर बांधवांना त्यांचे आधार कार्ड मिळावे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या सुविधा त्यांना मिळाव्या व मेंढपाळांना चराईसाठी जमीन उपलब्ध करून द्यावी यासह अनेक समस्या धनगर मेंढपाळ बांधवांनी त्यांच्यासमोर ठेवल्या. येणाऱ्या काही दिवसांमध्येच मी स्वतः मुंबईच्या राजभवनात तुम्हाला बोलावेल व राज्य सरकार पुढे तुमच्या सर्व समस्यांचे निराकरण असे आश्वासन यावेळी मेघालय चे राज्यपाल चंद्रशेखर एच, विजयाशंकर यांनी मेंढपाळांना दिले त्यानंतर मेंढपाळ यांनी त्यांना आपल्या वाड्यावरच बेसन भाकर व रानभाज्यांचा पाउंचार दिला. यावेळी राज्यसभेचे माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे, धनगर समाजाचे नेते संतोष महात्मे यासह शेकडो धनगर समाज बांधव व मेंढपाळ उपस्थित होते.

## अज्ञात चार चाकी वाहनाची दुचाकीला जोरदार धडक : २ जण गंभीर तर एकाला किरकोळ मार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

बडनेरा पोलीस स्टेशन अंतर्गत राज्यमार्ग जुना बायपास वरील हॉटेल लाली लॉन जवळ एका अज्ञात भरधाव वेगाने येणाऱ्या कारने दुचाकी स्वारांना उडविले या अपघातात दोन जण गंभीर जखमी झालेत तर एक किरकोळ जखमी झाला आहे. रामेश्वर पकडे, प्रदीप पकडे व प्रदीप पारडे असे जखमींचे नावे असून तिघेही राहणार जुनी वस्ती बारीपुरा बडनेरा येथील राहणारे आहेत. हे स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्रमांक एम एच



२७ एजे ३९ ५३ या दुचाकीने अमरावती वरून बडनेराकडे जात असताना यांना अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने येऊन धडक दिली व घटनास्थळावरून वाहन घेऊन पसार झाले या अपघातात प्रदीप पकडे व प्रदीप पारडे गंभीरत्या जखमी झाली असून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस पथक घटना स्थळी रवाना झाले असून अज्ञात वाहनाचा तपास सुरु केला आहे.

## नागपुरातही डॉ.बोंडे,गायकवाड यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर :**

काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाजप नेत्यांकडून वारंवार धमकी दिली जात आहे, असा आरोप करीत या विरोधात काँग्रेसने गुरुवारी व्हेरायटी चौकात आंदोलन केले. यानंतर शहर अध्यक्ष आ. विकास ठाकरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सीताबर्डी पोलीस ठाण्यात धडक देत संबंधित नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

राहुल गांधी यांच्या विरोधात प्रक्षोभक वक्तव्य करणारे शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड, खा.अनिल बोंडे, केंद्रिय मंत्री रविनत बिट्टू, तरविंदरसिंह मारवा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी केली.


यावेळी आ. विकास ठाकरे यांच्यासह माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, आ. ड. अभिजीत वंजारी, माजी आ. अशोक धवड, प्रदेश महासचिव व उद्योग व वाणिज्य सेलचे प्रमुख अतुल कोटेचा, सोशल मिडिया प्रमुख विशाल मुत्तेमवार, महासचिव उमाकांत अग्निहोत्री, गिरीश पांडव यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह घेणार विदर्भातील जागांचा आढावा

### कोअर कमिटीसोबत संवाद साधण्याची शक्यता : २३ सप्टेंबरला नागपूर दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नागपूर**

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून नियोजनाला सुरुवात झाली असून, बूथ पातळीपर्यंतची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. मागील विधानसभा निवडणूक व लोकसभा निवडणुकीत नागपूर जिल्ह्यासह विदर्भात महायुतीला अपेक्षित जागा न मिळाल्यामुळे पक्षाकडून विशेष पावले उचलण्यात येत आहेत. याअंतर्गतच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे स्वतः नागपुरात येऊन विदर्भातील जागांचा आढावा घेणार असून, ते २३ सप्टेंबर रोजी कोअर कमिटीच्या सदस्यांसोबत संवाददेखील साधण्याची शक्यता असल्याची माहिती पक्षातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली आहे.



मागील काही दिवसांपासून भाजपचे वरिष्ठ नेते व मध्य प्रदेशचे कॅबिनेट मंत्री कैलास विजयवर्गीय हे संपूर्ण जिल्हा पिंजून काढत आहेत. त्यांनी शहरातील सहा व जिल्ह्यातील सहा, अशा बारा जागांवरील तयारीचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बालेकिल्ला असलेल्या दक्षिण पश्चिम मतदारसंघाच्या नियोजनाबाबत त्यांच्याच उपस्थितीत विजयवर्गीय यांनी जाणून घेतले होते. केंद्रीय नेतृत्वाने नागपूर जिल्ह्यावर विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना केल्या आहेत. याअंतर्गतच आता अमित शाह हे स्वतः नागपुरात येणार आहेत.

यावेळी ते जिल्ह्यातील बाराही जागांचा आढावा घेतील. तसेच ते विदर्भातील जागांबाबतदेखील सखोल आढावा घेणार आहेत. जिल्हा व ग्रामीणच्या कोअर कमिटीच्या सदस्यांसोबत ते संवाद साधतील अशी अपेक्षा आहे. याबाबत बुधवारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांना स्पष्टता देण्यात आली. २३ सप्टेंबर रोजी अमित शाह यांच्या उपस्थितीत ही बैठक कुठे आयोजित करायची याबाबत भाजप पदाधिकाऱ्यांकडून दोन ते तीन विविध पर्यायांचा विचार सुरू आहे सध्या केवळ अमित शाह यांच्या दौऱ्याची तारीख निश्चित झाली असून, आढावा बैठकीचे स्वरूप दोन दिवसांत अंतिम होईल, अशी माहिती एका पदाधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

## थैंक्यू साहेब, उत्सवात अहोरात्र झटणाऱ्या विघ्नहर्त्यांना सलाम

### एक हजार ८०० हून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांनी पाळली शिस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

गणपती विसर्जनाच्या आनुषंगाने शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात होता यामध्ये ३ पोलीस उपायुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, १ हजार ३०० पोलीस अधिकारी, आरसीपी, क्यूआरटी पथक, १ एसआरपीएफ कंपनीसह ५५० जवानांचा समावेश आहे. तसेच महिला होमगार्ड, अशा एकूण १ हजार ८०० हून अधिक पोलीस बंदोबस्त तैनात होता



लोकसंखेच्या तुलनेत पोलिसांचे संख्याबळ अपुरे आहे. त्यात सण उत्सवात आणि कायदा व सुव्यवस्थेत विशेष खबरदारी घेताना पोलिसांची चांगलीच कसरत होते. विशेष म्हणजे कुटुंब आणि आपले कर्तव्य बजावताना पोलिसांची चांगलीच तारांबळ उडते. पहाटेपासून ते मध्यरात्रीपर्यंत गणेश विसर्जन काळात पोलिसांना दक्ष राहावे लागते.

संवेदनशील भागात तर टेंथ टाकून त्यांना खडा पहारा द्यावा लागतो. उत्सवातील दहा दिवस त्यांच्यासाठी अतिश जोखमेचे असतात. विशेष म्हणजे या काळात अनेक पोलिस बांधवाकडे गणेश स्थापना आणि विसर्जनही असते. घरचा उत्सव आणि कर्तव्यातील उत्सवाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असते. घरची मंडळीगणेश विसर्जन करतात. आणि पोलिसांना सार्वजनिक मंडळाच्या विसर्जनावर लक्ष केंद्रित करीत संपूर्ण व्यवस्थेचा भार सहन करावा लागतो. त्यातही संपूर्ण यंत्रणा अतिशय शिस्तीत आपली जबाबदारी पार पडत असते. या काळात तहानभूक हरवून संपूर्ण स्थितीवर त्यांना लक्ष केंद्रित करावे लागते. वाद्यांच्या आवाजात संपर्क साधताना वॉकीटॉकीचा वापर पोलिसांमधील संदेशांना अतिशय दिल गतिमानतेने कार्यान्वित करण्यात आले होते. यातून दक्षता पाहायला मिळाली.

शहरात शनिवारी ७ ते १७ सप्टेंबर दरम्यान गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे तसेच १६ सप्टेंबर रोजी ईद-ए- मिलाद सण साजरा झाला त्यामुळे शहरातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी, १४ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी छत्रीतलाव येथील गणेशमूर्ती विसर्जनस्थळाची तसेच फरशी स्टॉपपासून छत्री तलावविसर्जन मार्गाची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. तसेच बॅरिकेड्स, लाइटिंग योजना, आपत्कालीन टॉर्च, सीसीटीव्ही कॅमेरे, उंचीवरून विसर्जनस्थळावर लक्ष ठेवण्यासाठी मचान. छत्री तलावालगत कृत्रिम तलाव तयार करणे,मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्यांची वर्गवारी करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, जलतरणपटू तैनात करणे आदी कामांबाबत महापालिका, महामंडळ, स्वच्छता विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग आणि पोलीस अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. आयुक्तालय क्षेत्रातील पोलीस ठाणेनिहाय शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे, संमिश्र व संवेदनशील वस्ती या ठिकाणी फिक्स पॉइंट बसविण्यात आले होते नागरिकांच्या सुरक्षेसाठी १२ सीआर मोबाईल व्हॅन, ७ दामिनी पथक, बीट मार्शल आणि डायल ११२ वाहने शहरात सतत गस्तीवर होत्या शहरातील चौकाचौकात पोलिसांची करडी नजर होती .तसेच सायबर सेल पोलिसांचे विशेष पथक सोशल मीडियावरही लक्ष ठेवत होते.

## तिसऱ्या आघाडीच्या बैठकीला बच्चू कडू गैरहजर : महाविकास आघाडी आणि महायुती सरकार अपयशी - राजू शेट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९संभाजी नगर**

महायुती आणि महाविकास आघाडी यांना निवडणुकीच्या मैदानात टक्कर देण्यासाठी तिसऱ्या आघाडीच्या स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. आज पुण्यात या तिसऱ्या आघाडीसाठी बैठक होणार आहे. या बैठकीला बच्चू कडू येणार होते परंतू ते येऊ शकलेले नाहीत, असे तिसऱ्या आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. सर्किट हाऊसला दुपारी बैठक होणार आहे. सध्या महाराष्ट्राला अजून एका चांगल्या पर्यायाची गरज आहे. आघाडीच नाव काय असाव? आघाडी कशी असेल यावर चर्चा होणार आहे.



महाराष्ट्रात काय नाविन्यपूर्ण देता येईल हे बैठकीत ठरणार आहे. शेतकऱ्यांसाठी लढणारे नेते आज आलेले आहेत. सध्याच्या सत्ताधाऱ्यांना नागरिक कंटाळले आहेत, असे छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितले. यावेळी राजू शेट्टी म्हणाले की, एक सक्षम पर्याय म्हणून तिसरी आघाडी असेल. हा आमचा केवळ प्रयत्न आहे. महाविकास आघाडी आणि महायुती सरकार अपयशी ठरली आहे. राज्यात महिला असुरक्षित आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. कामगारांचे प्रश्न आहेत. हे प्रश्न सत्ताधाऱ्यांनी कधीच सोडविले नाहीत, अशी टीका शेट्टी यांनी केली.

# ‘पीएम’ उद्या वर्ध्यात; शहरात सुरक्षा व्यवस्था तैनात

## जड वाहनांना शहरात असणार प्रवेशबंदी: वाहतुकीच्या मार्गातही केलाय बदल, शहरातील मैदानांवर वाहनतळ निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९वर्धा**

केंद्र शासनाच्या पी. एम. विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत २० सप्टेंबरला स्वावलंबी मैदानात होणार आहे. त्याकरिता शहरात तगडी सुरक्षा व्यवस्था राहणार असून, शहरातील वाहतुकीच्या मार्गातही बदल करण्यात आला आहे. तसेच वाहनतळांचीही निश्चिती करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांनी केले आहे.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील नागरिक मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे २० सप्टेंबर रोजी सकाळी ६:०० ते रात्री ९:०० वाजेपर्यंत वाहतूक व रहदारीचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, म्हणून सभास्थळाकडे जाणारा रहदारीचा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी तसेच पार्किंगस्थळाकडे जाणारा मार्ग कार्यक्रमाकरिता येणाऱ्या वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या वाहनांकरिता रहदारी मार्गात बदल करण्यात आला आहे. जड वाहनांना शहरामध्ये प्रवेशबंदी केली आहे. रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने व अतिमहत्त्वाच्या सेवा देणाऱ्या वाहनांना यामधून सूट देण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षकांनी दिली.



**वाहतुकीकरिता हे मार्ग असणार बंद**

सेवाग्राम चौक ते गांधी पुतळा शासकीय रेस्ट हाऊस, आरती चौक, धुनीवाला मठ, न्यू आर्टस कॉलेज, आर्वी नाका, पावडे चौककडून येणाऱ्या वाहतुकीस मञ्जाय केला आहे.

जुनापाणी चौक ते आर्वी नाका : बॅचलर रोडमार्गे पावडे चौक येणाऱ्या वाहतुकीस मज्जाव, स्वावलंबी मैदान (सभास्थळ), संत तुकडोजी मैदान (हेलीपेंड) सभोवताली २०० मीटरपर्यंत येणाऱ्या सर्व मार्गांवर मन्त्राय करण्यात आला आहे. बजाज चौक, शास्त्री चौक, बॅचलर रोड मार्गे स्वावलंबी मैदानाकडे येणारे मार्ग, स्वावलंबी मैदान, संत तुकडोजी महाराज मैदान सभोवताली २०० मीटरपर्यंत व आर्वी नाका ते शास्त्री चौकापर्यंत बॅचलर रोड नो पार्किंग झोन व नो हॉकर्स झोन घोषित करण्यात आला आहे.

**या मार्गात बदल**

हिंगणघाट, समुद्रपूर या परिसरातील वाहतूक जाम चौरस्ता मार्गे हिंगणघाट, धोतरा, वायगाव चौरस्ता, सेलू काटे, बोरगावमार्गे वर्धा येथे येईल. शेडगाच फाटामार्गे येणारी वाहतूक सेवाग्राम चौक, बापू कुटी, नांदोरा, मांडवगड टी पॉइंट, आष्ठा, भुगाव, सेलू काटे रोड़, बोरगावमार्गे वर्धेकडे येईल. तसेच कारंजा, आष्टी, सेलू परिसरातून येणारी वाहतूक साटोडा टी पॉइंट, कारला टी पॉईंट, जुनापाणी चौक उड्डाणपूल, हिंदी विश्वविद्यालय उड्डाणपूल, शांतीनगर उडाणपूल, नागवाणा टी पाईंट, सावंगी टी पॉडेंट, देवळी नाका दयालनगर, कृषी उत्पन्न बाजार समिती यामार्गे वर्धा शहराकडे येतील..

**’नो फ्लाय झोन’ घोषित**

पी. एम. विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त २० सप्टेंबर रोजी स्वावलंबी मैदान सभास्थळ व सर्व हेलीपॅडच्या सभोवताली दोन किलोमीटर परिसरात ड्रोन अथवा तत्सम हवाई साधने, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हँडग्लायर्डर्स आदींचा वापर करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई आदेश लागू केला आहे. स्वावलंबी मैदान येथे आयोजित कार्यक्रमाला पंतप्रधानांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे सभास्थळ आणि हेलीपेंड परिसर तो पलाय झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यादर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कडॉले यांनी दिला आहे.